# अंधश्रद्धांची दुनिया चमत्कारांची किमया

भाग २

अंधश्रद्धांची दुनिया, चमत्कारांची किमया या पुस्तकाच्या पहिल्या भागाला अजूनही जोरदार मागणी असते. तो प्रसिद्ध झाल्यापासून बुवाबाजी आणि चमत्कारविरोधी संघर्ष, आव्हान तसेच प्रबोधनयात्राही निघाल्या. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या या चळवळीमुळे महाराष्ट्रभर चमत्कारांबद्दल मोठी जनजागृती झाली. परिणामी महाराष्ट्रात चमत्काराचा दावा करणारे नवे बुवा निर्माण होताना फारसे दिसत नाहीत. तथापि या साऱ्यांवर मात करणारी गणपतीच्या दुग्धप्राशनाच्या चमत्काराची घटना आपल्याला देशाच्या मानसिकतेची चुणूक दाखवून गेली. या मोठ्या आव्हानाला तोंड देताना लोकांपर्यंत चिकित्सक दृष्टीकोन घेऊन जाण्याच्या कामातील ही पुस्तिका एक छोटसं पण प्रभावी साधन आहे.

आणखी कितीतरी चमत्कारांचे प्रकार, ठिकाणं आपल्याला आढळू शकतील पण त्यांची निव्वळ जंत्री वाढवण्यापेक्षा चमत्कारांची चिकित्सा करण्याची मानसिकता निर्माण होणं अधिक महत्त्वाचं आहे असं आम्ही समजतो.

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रकाशन

# अंधश्रद्धांची दुनिया चमत्कारांची किमया

भाग २

प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे



# अंधश्रद्धांची दुनिया चमत्कारांची किमया

## भाग २

प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रकाशन

**अंधश्रद्धांची दुनिया**
**चमत्कारांची किमया**
- भाग २

■

**लेखक :**
प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे
ॐ विश्वेश्वर दर्शन अपार्टमेंटस्,
ठाकुरवाडी, डोंबिवली ४२१२०२.
दूरध्वनी : (०२५१) ४८६०९७.

■

**पहिली आवृत्ती : २१ सप्टेंबर १९९९**


© महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
१५५, सदाशिव पेठ, सातारा.


■

**प्रकाशक आणि मुद्रक :**
मिलिंद जोशी
कार्यवाह, प्रकाशन विभाग
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
२/१४, मारवा, अनुपम पार्क,
१०/२ अ, कोथरूड, पुणे ४११०२९.

**वितरक :**
मारुतराव पांगे
सहकार्यवाह, प्रकाशन विभाग
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
४०, शिवनेरी कॉलनी, गोडोली,
सातारा ४१५००१.

■

**निर्मिती व अक्षरजुळणी**
अनुपम क्रिएशन्स
२/१४, मारवा, अनुपम पार्क,
१०/२ अ, कोथरूड, पुणे ४११०२९.

■

**मुद्रणस्थळ :**
साप्ताहिक मुद्रण
१०२५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

■

**मुखपृष्ठ व चित्रे :**
नीलेश बागवे, डोंबिवली

■

**किंमत : २० रुपये**


## कृतज्ञता


या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी
**सौ. सूरजादेवी मंत्री**
यांचे उदार आर्थिक सहाय्य लाभले आहे.
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती त्यांची
अंत:करणपूर्वक आभारी आहे.




# मनोगत

'अंधश्रद्धांची दुनिया चमत्कारांची किमया' या पुस्तकाच्या पहिल्या भागाची महाराष्ट्रात विक्रमी विक्री झाली व सतत गेली ६/७ वर्ष दुसऱ्या भागांविषयी लोक मागणी करू लागले. कित्येकांनी दुसऱ्या भागासाठी मनीऑर्डरदेखील पाठविल्या. अं.दु.च. कि. भाग-२ मध्ये २५ चमत्कार आहेत. भाग-१ च्या आतापर्यंत ८ आवृत्त्या निघाल्या. त्यातून चमत्कारामागील रहस्य जाणून घेण्याची लोकांची मानसिकता समजावून घेऊन भाग-२ चे लिखाण करण्यात आले आहे. यापेक्षा कित्येक चमत्कार महाराष्ट्राच्या विविध भागात घडत असतात. लोकांनी ते आम्हाला पत्राद्वारे कळवावेत जेणे करून आम्ही त्यामागील विज्ञान स्पष्ट करू शकू.

या पुस्तकात रोग, रोगांविषयी अज्ञान, त्या अज्ञानामागील गैरसमज, गैरसमजातून फायदा घेण्यासाठी महाराज एखाद दुसरा चमत्कार कसा करतात आणि त्या चमत्कारामागे काय विज्ञान असते. या सर्वांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. वाचकांना तो आवडेल अशी आशा आहे.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत माझे चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते व सहकारी मा. श्री. प. रा. आर्डे , श्री. टी. बी. खिलारे व राजीव देशपांडे यांनी वेळोवेळी तपासून मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे. तसेच हे पुस्तक लिहावे म्हणून महाराष्ट्र अंनिस कार्याध्यक्ष व आमचे मार्गदर्शक डॉ. नरेंद्र दाभोलकर ह्यांनी सतत धोशा लावल्यामुळे हे पुस्तक लिहून झाले त्याबद्दल त्यांचा ही मी आभारी आहे.

अरुण रणदिवे व बापू राऊत यांनी पुस्तकांची हस्तलिखिते तयार करण्यात मदत केली, पुस्तकात काही नवीन चमत्कारांचा समावेश करावा म्हणून मा. श्री. शब्बीरभाई शेख यांनी काही चमत्कार सुचविले, तसेच मुखपृष्ठ व सजावट कल्पकतेने करणारे चळवळीतील कार्यकर्ते नीलेश बागवे आणि प्रकाशन विभागाचे कार्यवाह मिलिंद जोशी या सर्वांचा मी ऋणी आहे. शेवटी माझी पत्नी सुशीला हिने चमत्कारामागील विश्लेषण सोपे करण्यासाठी वेळोवेळी सूचना केल्या त्याबद्दल तिचेही आभार मानून हे मनोगत पूर्ण करतो.

**- मच्छिंद्रनाथ मुंडे**

# ■ बुवाच्या पोतडीतून ■


| | | |
|---|---|---|
| १. | अंड्यावर झडप, तांब्यात गडप | ५ |
| २. | कापूरवडी पाण्यावर नाचते, दिशा भुतांची दाविते | ७ |
| ३. | करणीचे दूध निळं, डोक्यातील असे हे खूळ! | १० |
| ४. | कवड्या नाचती, भुतं गाव सोडून जाती | १३ |
| ५. | देव देवस्कीची बाधा असा, लिंबातून धागा निघे भसभसा | १५ |
| ६. | रक्ताचा सडा, मुठीचा फटका | १७ |
| ७. | स्वप्नांचा जाच, नादब्रह्माचा आवाज | १९ |
| ८. | गुप्त लिखाणाची मोहमाया, फुला-फळांच्या रसाची किमया ! | २१ |
| ९. | बाबांच्या हाती मोहमाया, फुलांची बदली काया | २४ |
| १० | मनकवड्याच्या करामती, भल्याभल्यांची होते गुंग मती ! | २७ |
| ११ | मनकवड्या हिकमती, अजब त्याच्या करामती | ३० |
| १२. | महाराज फारच अंतर्ज्ञानी, चलनी नोटांचे नंबर जाणी | ३२ |
| १३. | बाबांना प्रसन्न झालाय जटाधारी, अवतरली गंगा पृथ्वीवरी | ३४ |
| १४. | फोटोतूनी विभुती, सत्यसाईची ख्याती | ३६ |
| १५. | किती भाऊ-बहिणी, सांगू तुमच्या कानी | ३८ |
| १६. | योगिक शक्तीचा दावा, नाडी बंद पाडण्याचा कावा | ४० |
| १७. | नुसत्या पाण्याने, राखेतून अग्नी फुले | ४१ |
| १८. | अंगावर टोचूनी लिंबू-फुले, चमत्कार म्हणती तयाला खुळे | ४२ |
| १९. | कमाल दैवी शक्तीची, धमाल एका अंड्याची ! | ४३ |
| २०. | करणी मुठीचा दावा, मलंग बाबांचा बेरकी कावा ! | ४५ |
| २१. | कौल नशिबाचा, की निर्वात होण्याचा ? | ४७ |
| २२. | आली आली सिंहस्थ पर्वणी, ऐका नागा साधूंची कहाणी | ५० |
| २३. | दुग्ध प्राशन गणरायांचं ! | ५३ |
| २४. | आम्हा अंगे दैवी शक्ती, ही तर पाणाड्याची क्लृप्ती | ५५ |
| २५. | बाबा बंगाली, पक्का असे मवाली ! | ५८ |


◆◆◆



# अंड्यावर झडप तांब्यात गडप

सदामामा गेले चार महिने अंथरूणावर खिळून होता. सतत विचारात गढून जात असे. काहीही काम करीत नसे. अनेक तऱ्हेच्या खोट्या पोथ्या व भूतांखेतांच्या कथा वाचीत बसे. त्यावरच विश्वास ठेवून सतत घरात किंवा बाहेर कुणीही अनोळखी माणूस दिसला की त्याच्यावर संशय घेई, व त्याच्याशी भांडे. जणू काय सर्व लोक आपल्या विरूद्ध आहेत. जेवणात विष घातले आहे. कुणीतरी कानात सतत काहीतरी सांगत आहे. शिव्या व ओव्या दोन्ही एकाच वेळी ऐकू येत. कधी कधी स्वत:च त्यांना शिव्या देई. स्वत:शीच हसे, रडे व सतत बडबड करे. साधे संडास कुठे करायचे हे देखील त्याला कळत नसे. दिवसेंदिवस त्याची बडबड क्षीण व अस्पष्ट होत चालली होती.

मधल्या काळात सदामामांना नातेवाईकांनी मांत्रिकाकडे नेले. परंतु प्रत्येक वेळी भूतबाधा आहे. कुणीतरी करणी केली आहे. असे मांत्रिकाने सांगितले. अंगारा लावणे, उतारा करणे, मारहाण करणे, बकऱ्या कोंबड्यांचा बळी देणे असे प्रकार चालू होते. कधी कधी लोक म्हणत; 'त्याच्या नशिबात तसे आहे; तो त्याचे भोग भोगतो आहे, दुसरे काय'?

आज सदामामांना गडावरील चंद्या भगताकडे त्याच्या दरबारात आणले होते. चंद्या भगताचा दरबार महिन्यातून दोनदा भरत असे. एकदा अमावस्येला व एकदा पौर्णिमला. पोर्णिमेला दरबार रात्री तर अमावस्येचा दरबार दिवसा. अमावस्येला 'बाहेरची बाधा' झालेली गिऱ्हाईकं गर्दी करत. सदामामांना बाबांपुढे बसविण्यात आले. चंद्या भगताने एकच नजर मारली व त्याला पारावरच्या खविसाने धरलं आहे. असे सांगितले. त्वरित उपाय म्हणून विधी सुरू केला. विधी पुढीलप्रमाणे होता.


चंद्या भगताने एका भांड्यात स्टोव्हवर सर्वासमक्ष पाणी उकळत ठेवले. ट्रे मधून एक अंडे हातात घेऊन ते चार वेळा सदामामांच्या डोक्यापासून पायापर्यंत उतरवून त्या उकळणाऱ्या पाण्यात टाकले. काही वेळाने नंतर ते गरम पाणी एका तांब्यात ओतले व त्वरित त्यावर ते अगोदरच उकडून सोललेले अंडे ठेवले. तांब्याचे तोंड बंद झाले नंतर एक हातरुमाल थंड पाण्यात भिजवून तो तांब्याला लपेटला. काही वेळांनतर भगताच्या मंत्र पुटपुटण्याने अंडे सावकाश तांब्याच्या आत सरकू लागले. आणि थोड्यात वेळात अंडे पूर्णपणे तांब्यात ढकलले गेले. भगताची बडबडही थांबली. सदामामांच्या बरोबर

आलेली मंडळी केव्हा पासून श्वास रोखून बसली होती, तीही भानावर आली.

**दावा :** सदामामांच्या भूतबाधेचा बंदोबस्त झाला आहे, असे चंद्या भगताने सांगितले. भुताचे खाद्य आपण त्याला दिले आहे. यापूढे सदामामांना काही काळ तरी भूतबाधा होणार नाही, असेही सांगितले.

**रहस्यभेद :** चंद्या भगताने जो चमत्कार दाखवला तो साधा विज्ञानावर आधारित प्रयोग आहे. उकळणाऱ्या पाण्यातून बाहेर पडणाऱ्या वाफा अंड्याच्या झाकण्याने तांब्यातच बंद झाल्या. काही वेळाने बाहेर थंड पाण्यात भिजवलेल्या फडक्याने तांब्यावर आवरण घातल्यामुळे आतील वाफेला थंड पृष्ठभागाने थंडावा निर्माण झाल्यामुळे तिचे पाण्यात रूपांतर झाले. परिणामी बाहेरील हवेचा दाब आतील पोकळीमुळे वाढला व अंडे चंबूत ढकलले गेले. यात कुठेही दैवीशक्ती किंवा भूताला खाद्य पोहचले असे म्हणण्याला वाव नाही. परंतु लोक अशा गोष्टींवर केवळ अज्ञानामुळे विश्वास ठेवतात. आणि म्हणूनच अनेक व्यक्ती सदामामांप्रमाणेच आपले आयुष्य गमावून बसतात.

**वास्तव :** सदामामांना तात्पुरते बरे वाटले. परंतु काही काळाने त्यांचा आजार तसाच बळावत गेला कारण त्यांना भूतबाधा नव्हती किंवा कोणी करणी सुद्धा केली नव्हती. कारण या जगात भूत नसते. आणि करणी करणे, मूठ मारणे, चेटूक घालणे, देव घालणे, ह्या सर्व अंधश्रद्धा आहेत. वास्तविक पाहता, जी लक्षणे सदामामांच्या शरीरात व वागण्यात दिसत होती ती 'पॅरानॉईड स्किझोफ्रेनिया' किंवा 'दुभंगलेले संशयी व्यक्तिमत्त्व' ह्या आजारांची होती. त्यामुळे कुठल्याच भगताकडे, महाराजांकडे किंवा देवऋष्याकडे जाऊन हा आजार बरा होणार नव्हता. उलट चुकीच्या पद्धतीने उपचार करीत राहिल्यामुळे सुरूवातीला प्राथमिक अवस्थेत असलेला हा आजार पुढे वाढत गेला व सदामामा कायमचे आयुष्यातून उठले.



◆◆◆



# कापूरवडी पाण्यावर नाचते दिशा भुतांची दावते


जॉन परेरा यांची एकुलती एक मुलगी सायली. ती गेले दोन दिवस तापाने आजारी होती. जॉनने अनेक उपाय केले. परंतु ताप वाढतच गेला. जॉनचे मन सैरभैर झाले. त्याच गावात यशोदा भक्तीण राहत असे. यशोदामातेच्या अनेक लीला जॉनने ऐकल्या होत्या. परतुं जॉन हा धर्माने ख्रिश्चन असल्यामुळे यशोदामातेच्या दर्शनास तो पूर्वी कधीही गेला नव्हता. परंतु आज मात्र ज़ॉनवर अशी आपत्ती आली की त्याला यशोदा मातेच्या दरबारात जावेच लागले. कारण, कोणत्याही परिस्थितीत सायलीचा ताप उतरायला हवा होता. जॉन सकाळी सकाळीच यशोदामातेच्या दरबारात सायलीला घेऊन गेला.

सायलीला मातेसमोर पाटावर बसवले. यशोदा मातेने सायलीच्या कपाळावर भंडारा लावला. तोंडाने काही तरी पुटपुटले आणि सांगितले की, सायलीला झपाटले आहे. त्यावर एकच उपाय आहे, हडळीला तिचा नैवेद्य दिला पाहिजे. जॉनच्या दृष्टीने हे सर्व नवीन होते. त्याने न समजताच मान डोलवली. 'उद्या रात्री आपण भुतांची जागा कोणत्या दिशेला आहे हे हुडकून काढू व हडळींना संतुष्ट करू,' असे यशोदामातेने जॉनला सांगितले. बिचारा जॉन सायलीसह घरी परतला. रात्री ताप वाढतच गेला.

दुसऱ्या दिवशी सांगितलेल्या सामानासह जॉन परेरा सायलीसह दरबारात गेला. यशोदामातेने एक परात घेतली व त्यात पाणी ओतले. नंतर एकेक करून कापराच्या तीन वड्या पेटवून परातीतील पाण्यात सोडल्या. यशोदामातेने मंत्रोपचार सुरू केला. हातात एक वेताची छडी घेऊन सायलीच्या पायावर सपकन दोन छड्या मारल्या. सायली रडायला लागली. मग यशोदा मातेने जोरजोराने भुतांची नावे घेतली. थाळीच्या बाजूला जमिनीवर जोराने हात आपटले. चल ये, इकडे ये, असे काहीतरी सारखी बडबडली. बघता बघता कापूर यशोदामातेच्या इशाऱ्यावर नाचू लागला. यशोदामाता सांगेल त्या दिशेला कापूर जाऊ लागला. हे सर्व पाहून सायली, जॉन व सायलीची आई परियम्मा अवाक झाले. पश्चिम दिशा ही भुताची आहे असे जाहीर करून भुताचा नैवेद्य त्या दिशेला ठेवला. जॉनने यशोदामातेची २५१ रुपये दक्षिणा पेटीत टाकली. सर्वजण गुमान घरी आले. ताप मात्र अजूनपर्यंत उतरला नव्हता परंतु सायंकाळी ताप

धीम्या गतीने उतरु लागला. आणि तासभरात सायलीला बरे वाटले.

**दावा :** ज्या दिशेला पाण्यावर तरंगणारा पेटता कापूर परत परत जातो त्याच दिशेचे भूत लागले आहे असा दावा मांत्रिक देवऋषी नेहमी करतात व भोळ्या भाबड्या जनतेला फसवितात.



**रहस्यभेद :** कापूराची वडी मांत्रिकाच्या हाताच्या इशाऱ्यावर नाचत नसते तर ती वाऱ्याच्या दिशेने नाचत पुढे सरकते. हे ओळखूनच मांत्रिक त्याच दिशेला हात आपटतो. बघणाऱ्याला मात्र असे वाटते की कापूर पाण्यावर मांत्रिकाच्या इशाऱ्यावर नाचतो.

**वास्तव :** सायलीचा ताप हा मनोशारीरिक आजाराच्या प्रकारातील होता. म्हणजे सायली ही मुलगी अनेक प्रकारच्या संस्कारांमुळे मनाने फारच हळवी झाली होती. मध्यंतरी सायलीला कुणीतरी भुताची कथा सांगितली होती. त्याच रात्री सायलीला भुताचे स्वप्न देखील पडले होते. ह्या सर्व प्रकारांनी ती रात्री एकदा-दोनदा दचकून उठली होती. सायलीच्या मनात भीतीने घर केले होते. त्यात अचानक त्या दिवशी शाळेतून घरी परतताना तिला एक भला मोठा साप रस्ता ओलांडताना दिसला होता. त्यावेळी ती प्रचंड घाबरली आणि त्यातूनच ती रात्री तापाने फणफणली. दोन दिवसांच्या डॉक्टरी उपायाने देखिल ताप उतरला नाही. परतुं सायलीच्या समोर यशोदामातेने थातूर मातूर चमत्कार करुन भुताचा बंदोबस्त नैवेद्य ठेवून केला तेव्हा मनोशारीरिक आजाराने पछाडलेल्या सायलीला हायसे वाटले व तिचा ताप हळू हळू उतरला.

मनोशारीरिक किंवा मनोकायिक आजारात (सायकोसोमॅटिक डिसीज) अनेक वेळा डॉक्टरांना यश न येता मांत्रिकांना लवकर यश येताना दिसते. याचे कारण ह्या आजारात मनावर परिणाम झाल्यामुळे शरीराला आजार जडलेला असतो. अशाप्रसंगी मांत्रिकाने छोटा मोठा चमत्कार दाखविला, आजारी व्यक्तीला मारहाण केली किंवा ज्या कारणामुळे हे घडले आहे ते कारण दूर केले किंवा त्याचा बंदोबस्त करतो असे आश्वासन जरी



दिले तरी आजारी व्यक्तीला तात्पुरते बरे वाटते. मनोविकार तज्ज्ञाशिवाय इतर डॉक्टरांकडे असे आजार मानसिक असल्यामुळे लवकर बरे होत नाहीत. जे सायलीबद्दल घडले तेच इतरांबद्दल घडते. आणि म्हणूनच मांत्रिकांचे फावते. त्यांचा धंदा भरभराटीला येतो. कारण समाजात मांत्रिक हे भूत, पिशाश्च, करणी, मूठ मारणे यांचे स्पेशालिस्ट असतात. संस्कार असेच केले जातात. त्यातूनच हे घडते. परतुं असे उपचार घेणे धोक्याचे असते. कारण पुढे आजार वाढण्याचा धोका संभवतो.

◆◆◆

# करणीचे दूध निळं, डोक्यातील असे हे खूळ!

अहमद हा सांगली जिल्ह्यातील एक खेडेगावात राहणारा एक तरुण. गेले अनेक महिने तो ठार वेडा पिसा झालेला. कधी कधी त्याच्या शरीराच्या एखाद्या भागातून अचानक संवेदना जाते. कधी कधी सार्वजनिक ठिकाणी त्याच्या अंगात येते. कधी त्याच्या शरीरात प्रचंड ताकद येऊ लागते. मग त्यावेळी प्रचंड उन्मादावस्थेत तो आपले कपडे फाडीत धावत सुटत असे. चादर गुंडाळून तोंडात कोंबत असे. विचित्र शब्द बडबडत असे. जणू काय त्याला इंग्रजी, गुजराथी, कोकणी सर्व भाषा येतात, असे वाटे. झटका संपला की पूर्ववत चांगला होत असे. अचानक पोटात तीव्र वेदना होत व प्रचंड मान आणि डोकेदुखी सुरू होई. अचानक थांबे सुद्धा.

एके दिवशी शेजारच्या अनुसयाबाईंनी अहमदच्या आईला शेजारच्या गडावर असलेल्या नारसिंग्या पैलवानाचा पत्ता सांगितला व त्याकडे दाखवून याच्या करणीचा बंदोबस्त करण्यास सांगितले. नारसिंग्या पूर्वी कुस्त्या करायचा. जसे वय वाढले व नारसिंग्याचे लग्न झाले तसे पुढे कुस्तीही सुटली. नोकरी न मिळाल्यामुळे बुवाबाजीचा बिनभांडवली धंदा गावाच्या बाहेर असलेल्या कुंडाळाच्या गडावर सुरू केला.

एके दिवशी अहमदला घेवून त्याचे आई वडील व अनुसयाचे पती काशिनाथराव गडावर भगताकडे गेले. अहमदच्या संपूर्ण आजाराची माहिती नारसिंग्या भगताने जाणून घेतली व म्हणाला, ''ह्याला करणीची बाधा झालेली आहे. तुमच्या गावांतील शत्रूंनी आपल्या एकूलत्या एक पोराचे वाईट व्हावे तो आयुष्यातून उठावा म्हणून करणी केली आहे. ती त्याच्या पोटातून काढावी लागेल. त्यासाठी छोटासा विधी करावा लागेल. येत्या अमावस्येला आपण तो करु.''

पुढच्या अमावस्येच्या वेळी येताना पुडीचा धागा एक मीटर, तीन गुलाबाची फुले, एक जास्वदींचे फूल, मातीचे छोटे भांडे (नवीन), एक मीटर तांबड्या रंगाचे कापड, एक लिटर निरसं दूध व दोन नारळ इत्यादी साहित्य घेऊन येण्यास सांगितले. अमावस्येला रात्री आठ वाजता अहमदसह त्याचे आई-वडील बाबांच्या गडावरील मठात हजर झाले. चोहोबाजूला नीरव शांतता, रातकिडे किर्रऽऽ किर्रऽऽ करताहेत. त्यामुळे रात्रीची भयानता आणखीनच वाढलेली. गडावरील बाबांच्या मठात दोनचं माणसे. एक



नारसिंग्या पैलवान व दुसरी त्याची शिष्या रेणुका. बावाने अहमदला पाय धुण्यास सांगितले. त्याला पाटावर बसवून एका मातीच्या छोट्याश्या भांड्यात दूध ओतले. पुडीच्या पांढऱ्या धाग्याचे एक टोक अहमदच्या तोंडात दिले व दुसरे टोक समोर ठेवलेल्या मातीच्या भांड्यातील दुधात सोडले. मग करणी उतरण्याची क्रिया सुरू झाली. नारसिंग्याने तोंडाने ३३ कोटी देवांचा व भुतांचा उद्धार करत एक फूल अहमदच्या माथ्यावरुन उतरवून समोरच्या दुधात टाकले. काही वेळाने दूध हळू हळू काळे-निळे होऊ लागते. बघता बघता संपूर्ण दूध निळे होऊन गेले. अशा रीतीने अहमदच्या पोटातील करणी उतरवली गेली.

**दावा :** चेटूक करणे किंवा चेटूक धाडणे, यालाच काही ठिकाणी 'देव घालणे' 'देवस्की' किंवा 'करणी' असे देखील म्हणतात. दूध पांढऱ्याचे निळे होणे म्हणजेच पोटात केलेली करणी, देव देवस्की काढून टाकली असा दावा नारसिंग्या पैलवानाने केला.

**रहस्यभेद :** बाबाने जेव्हा एक गुलाबाचे फूल अहमदच्या डोक्यावरून उतरवून दुधात टाकले त्यावेळी हातचलाखीने फुलात लपवून ठेवलेला छोटासा निळ्या शाईच्या गोळीचा तुकडा दुधात सोडला. पुढे काही क्षणातच त्याचा रंग दूधाला येऊ लागला. बघता बघता संपूर्ण दूध निळे झाले. बघणाऱ्या माणसाला हा चमत्कार वाटू शकतो.



त्याचप्रमाणे अहमदच्या आई-वडिलांना वाटले.

**वास्तव :** वास्तविक अहमदच्या आजाराची लक्षणे पाहता त्याला हिस्टेरियाचे झटके येत होते. या आजारात शरीरातील एखाद्या भागातील संवेदना अचानक नाहीशी होते. स्मृतीही जाते. कधी कधी वातावरणातील बदलांनी माणूस सैरभैर होतो. कधी कधी एपिलेप्सी (मिरगी व आकडी) या मेंदूच्या आजारतही रोग्यास अचानक झटका येतो. त्यावेळी रोगी अंगावरचे कपडे काढतो, फाडतो, धावत सुटतो, चादर वगैरे गुंडाळून तोंडात कोंबतो चित्र विचित्र हावभाव करतो.

तो न येणारी भाषा बोलतो. खरे म्हणजे ह्या आजाराला 'ग्लासोलोलिया' असे म्हणतात. माणसे ह्या आजारात जे शब्द बोलतात ते रोग्यांनी यापूर्वी कुठेतरी ऐकलेले असतात किंवा वाचलेले असतात. तेच त्यांच्या तोंडातून बाहेर पडतात. खरे म्हणजे ती भाषा नसते. जसे 'सू खबर माटे' असे कोणी म्हटले तर त्याला गुजराथी येते असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही. ह्या वाक्याला जोडून ती व्यक्ती जे काही बोलते ते नुसते गुजराथी भाषेतील छोटे शब्द असतात. पूर्ण वाक्य नसते.

अहमद हा मुस्लिम समाजातील आहे परंतु त्याच्या वर्गात शिकत असलेल्या काही गुजराथी मित्रांकडून त्याला थोडीफार गुजराथी भाषेची ओळख झाली होती. तसेच कोकणी मित्रांमुळे कोकणी देखील येत होती. ह्या आजारात तो जेव्हा अशी बडबड करीत असे तेव्हा लोक म्हणत, ''त्याला विविध भाषा येतात त्याअर्थी त्याला वेगवेगळ्या भुतांची बाधा जडली आहे. किंवा कधी करणी झाली आहे.'' असेही लोक म्हणत की, ''त्याच्या अंगात प्रचंड ताकद येते.'' ती देखील आपल्याच शरीरातील राखीव शक्ती असते. बाहेरून शक्ती शरीरात येत नाही.

हिस्टेरियाच्या आजारात भरपूर नाट्य असते. वैद्यकीय तपासात काही सापडत नसल्याने बाहेरची बाधा/भूत करणी आहे असे लोक समजतात. कधी कधी साध्या सूचनेने किंवा छोट्या मोठ्या चमत्काराने किंवा मारहाणीने रोग बरे होतात. त्यामुळेच अनेक मांत्रिकांचे फावते. अगांत येणे, हे बऱ्याचदा हिस्टेरिया मुळे असते. त्यातूनच संमोहन अवस्था प्राप्त होऊन माणसे तासन् तास् हे नाटक करू शकतात. अशा मनोशारीरिक आजार (सायकोसोमॅटिक डिसीज) असेही म्हणतात. मनावर परिणाम झाल्यामुळे शरीराला जडलेले आजार म्हणजेच हे आजार होत.


◆◆◆



# कवड्या नाचती, भुतं गाव सोडून जाती

खोणी हे भुतांनी जर्जर असे एकं गांव, पंचमंडळीत भुतांच्या कथांना ऊत आला होता. प्रत्येक जण मी भूत कसे पाहिले किंवा मी कसा घाबरलो नाही आणि कशा रीतीने भुताचा मुकाबला केला हे अगदी आवडीने सांगत होता. प्रत्येकाची तक्रार ही की गावाच्या बाहेर हायवेच्या बाजूला जी दोन-तीन भली मोठी झाडे आहेत ती पूर्णपणे रात्री बुंध्यापासून खोडापर्यंत काही अंतरावर रात्री प्रकाशमान होतात आणि अमावास्ये रात्री तर अधिकच. कधी कधी किर्रऽऽऽ असा आवाज देखील ऐकू येतो. सर्वांचे म्हणणे तेथे 'आग्या वेताळ' आहे. काही जणांनी हिम्मत करून जवळ जाण्याचा प्रयत्न केला, परंतु जवळ जाताच भूत(आग्या वेताळ) घाबरून अदृष्य होते, असे प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनी सांगितले.

मग ग्रामसभेत ह्या भुताचा बंदोबस्त करण्यासाठी महाबळेश्वरहून एका पॉवरबाज 'बाबाला' आणण्याचे ठरले. त्यासाठी गावकऱ्यांनी सर्वांकडून निधी जमा करायचे ठरले. आणि त्याप्रमाणे सर्व बंदोबस्त झाल्यावर एके दिवशी बाबाला गावात आणण्यात आले. ती अमावास्येची रात्र होती. गांवात नीरव शांतता. रात्रीचे ११वाजलेले. बाबा गावात सरपंचाच्या घरी येऊन हजर झाले.



बाबाने भुतांच्या सुरस कथा ग्रामस्थांकडून दिलखुषपणे ऐकल्या व रात्री स्वत: जाऊन गावाबाहेरील रस्त्याच्याकडेची तीन झाडेही पाहिली. ती खरोखरच प्रकाशमान भासत होती. बाबाने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी साहित्यांची जमाजमव केली. अगोदरच सूचना दिल्याप्रमाणे सर्व साहित्य गावकऱ्यांनी तयार ठेवले होते.

बाबाने एक पसरट वाटी घेतली. ७ ते ८ कवड्या (शिंपले) उपड्या घातलेल्या वाटीवर ठेवल्या. चारही बाजूला वाटीच्या सभोवताली फुले पसरली. हातात लिंबू घेऊन ते भुताच्या नावाने कापून त्या कवड्यांवर पिळले. असे एकेक करून भुताच्या नावाने ४ लिंबू पिळून कवड्यावर टाकताच कवड्या हळू हळू वाटीवरून खाली सरकू लागल्या. बघता बघता ८ कवड्या वाटीवरून घरंगळून खाली पडल्या.

**दावा :** गांवातील सर्व भुते आता गाव व ती झाडे सोडून गेली आहेत. कवड्या म्हणजे भुते व लिंबू हे त्यांचे खाद्य आहे.

**रसस्यभेद :** वास्तविक पहात बाबाने भुते वगैरे काही पळवून लावली नाहीत. वैज्ञानिक नियमांच्या व रासायनिक क्रियेचा आधार घेवून गावकऱ्यांना फसविले. कारण त्यानंतर देखील झाडे ही रात्री प्रकाशमान होतच होती.

खरे म्हणजे कवड्या (शिंपले) ह्या कॅल्शियम कार्बोनेट पासून बनलेल्या असतात. कवड्यांवर ज्या वेळी एखादे ॲसिड किंवा लिंबाचा रस (सायट्रिक ॲसिड) टाकला जातो त्यावेळी रासायनिक अभिक्रिया होऊन कार्बन डायऑक्सॉईडचे असंख्य बुडबुडे तयार होतात व ते फुटतात. त्यामुळे दाब निर्माण होऊन वाटीच्या गुळगुळीत पृष्ठभागावरून कवड्या (शिंपले) खाली घरंगळून पडतात.

**वास्तव :** खरे पहाता झाडे रात्रीच्या अंधारात चमकतात व गाववाले त्याला आग्या वेताळ म्हणतात. हे दुसरे-तिसरे काही नसून काही कीटक जे झाडांच्या सालीच्या आतमध्ये राहतात व रात्री बाहेर पडतात. त्यांच्या शरीरातून प्रकाश बाहेर पडतो. जसे काजवा. परंतु काजव्या शिवाय जंगली झाडांच्या सालीवर वाढणारे असंख्य कीटक आहेत. त्यातील काही प्रकाश बाहेर टाकतात. दूरवरून झाडाचे खोड प्रकाशमान दिसते. जवळ जाताच ते कीटक पुन्हा झाडाच्या सालीत लपून बसतात.

तसेच काही जंगली झाडांवर एका विशिष्ट प्रकारची बुरशी वाढते. ती बुरशी रात्री प्रकाशमान होते. लोक त्यालाच 'आग्यावेताळ' म्हणतात.


◆◆◆



## देव देवस्कीची बाधा आसा लिंबातून धागा निघे भसभसा

तुक्याचा 'झील' दिवसेदिवस चित्रविचित्र वागू लागला होता. नीट कपडे घालत नव्हता. आंघोळ करत नव्हता. स्वत:शीच बडबडत होता. विनाकारण हसत होता. विक्षिप्त हातवारे करत होता, असंबद्ध बोलत होता, इतरांच्या बोलण्याचे वेगळे अर्थ लावत होता, कधी कधी क्षुल्लक गोष्टीवरून घाबरत होता झुरळ पाल दिसली तरी जोराने किंचाळत होता, कधी कधी स्वत:चा पायच तुटला आहे असे सांगत होता, कधी पाठीवर कीटक चालतात असे सांगत होता. अशा या तुक्याच्या मुलाला त्याची मावशी यमू, सावंतवाडीच्या लक्ष्या भगताकडे घेवून गेली.

लक्ष्या भगत म्हणाला की, 'ह्याला देवदेवस्कीची बाधा झाली आहे. आणि ती केली आहे तुमच्या दुष्मनांनी. पुढच्या सोमवारी आपण ह्याच्या देवदेवस्कीचा बंदोबस्त करु. त्यासाठी दहा लिंबे घेऊन या. त्यात एक चारधारी लिंबू आणा.'' असे ही तो पुढे



म्हणाला.

सोमवारी तुक्या, त्याची पत्नी, आणि चिरंजिव (झील) पक्या व मावशी असे सर्वजण लक्ष्या भगताकडे गेले आणि विधी सुरु झाला.

लक्ष्या भगताने चारधारी लिंबू पक्याच्या तोंडात घट्ट धरण्यास सांगितले व इतर लिंबे डोक्यावरून एकेक करून चार-चार वेळा उतरवून मंत्र पुटपुटत, आठ दिशांना आठ लिंबे फेकून दिली. शेवटचे एक लिंबू हातात घेऊन त्यातून भसाभसा धागा ओढून काढला. हे सर्व पाहून सर्वजण घाबरले.

नंतर लक्ष्या भगताने दहावे लिंबू पक्याच्या तोंडातून बाहेर काढून हातात घेतले आणि धागा लिंबातून बाहेर काढला होता ते लिंबू जमिनीत गाडले.

**दावा :** आता देवदेवस्कीची बाधा दूर होईल. पण जातेवेळी देव्हाऱ्यात पक्याला पाया पडायला सांगा आणि दक्षिणा पेटीत टाका, असे लक्ष्या भगत सांगण्यास विसरला नाही.

**रहस्यभेद :** संपूर्ण नाटक करून हातचलाखीने दहा लिंबातून एक लिंबू बाजूला सारुन त्यामध्ये स्वत:चे लिंबू घुसवून लक्ष्या भगत बदमाषी करतो. खरे म्हणजे लिंबामध्ये सुईने धागे, मणी, काचेचे तुकडे, तांदूळ देखील भरता येतात. अशी लिंबे अनेक महाराज, देवऋषी, फकीर, भगत व मांत्रिक यांचेकडे तयार असतात. कोणत्याही टोकदार वस्तूने ह्या छोट्या मोठ्या वस्तू सरळ लिंबामध्ये ढकलता येतात. छिद्र मोठे होता कामा नये याची दक्षता घेणे गरजेचे असते.

**वास्तव :** पक्याला ह्या चमत्काराने बरे वाटले नाही. वैद्यकीय तपासणीअंती असे सिद्ध झाले की, त्याला स्किझोफ्रेनिया (दुभंगलेले व्यक्तिमत्त्व) हा आजार जडला होता. त्या आजाराची सर्व लक्षणे त्याच्यात दिसत होती.


◆◆◆



# रक्ताचा सडा मुठीचा फटका

इशाशेठला आज बरेच बैचेन वाटत होते. सकाळी उठले तेच चिडचिड्या स्वभावाने. रात्री जेवण सुद्धा गेले नव्हते. गेले सात-आठ दिवस त्यांना अस्वस्थ वाटत होते. शरीराच्या सर्व शारीरिक-मानसिक प्रक्रिया मंदावल्या होत्या. दिवसेंदिवस जीवन जगणे कठीण आहे, असे त्यांना वाटू लागले होते. त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येत होते. कधी डोकेदुखी, अर्धशिशी, ॲसिडिटी व झोप उडणे वगैरे प्रकार घडत होते.

त्या दिवशी अचानक हातापायाला जडत्व आले आणि तोंडातून अचानक रक्त आले. दोनदा रक्ताच्या उलट्या झाल्या. उभ्या असलेल्या जागीच ते गपकन खाली बसले. त्याच क्षणी त्यांच्या हातातील घड्याळ बंद पडले. ह्या सगळ्या प्रकारामुळे इशाशेठ पुरते हबकून गेले. हे झटके असेच चालू राहिले. मग कुणीतरी त्यांना भिवंडीच्या युनूस फकीराकडे नेण्यास सांगितले. ह्या दर्ग्यावर युनूस मुल्ला भूत, चेटूक करणी, भानामती यासाठी गंडे-दोरे, तावीज देण्याचे काम करीत असे. बाहेरची बाधा दूर करण्यासाठी तो नावारूपास आला होता. दररोज सकाळी सात वाजल्यापासून युनूस बाबाकडे प्रचंड गर्दी होत असे. त्या दिवशी रविवार होता. इशाशेठला आपल्या कारमधून दरबारात आणले गेले.




साधारण तासाभरात इशाशेठचा नंबर लागला. त्यांना देव्हाऱ्यासमोर उभे केले. युनूस फकिरने डोक्यावरून चार वेळा लिंबू उतरवले नंतर मोरपिसाने तोंडावर झाडू मारला.

इशाशेठचे अंग शहारले. युनूस बाबा 'बिसिमिल्ला हिर, हम्मा, निर हिम कुत्सीत मारीन, मियाँ निस, शाकीसिन, अबूसिन बिर हिमतय्या, अर हम्मून हिम्मीन' असे काहीसे बडबडला. दुसऱ्या हाताने सुरी घेवून लिंबू इशाशेठच्या डोक्यावर धरून कचकन कापले. बघता बघता लिंबातून रक्ताचा सडा वाहू लागला. हे सर्व पाहून उपस्थित सर्वजण हबकले.

**दावा :** इशाशेठला त्याच्या दुष्मनाने मूठ मारली होती. त्यामुळेच ते रक्ताच्या उलट्या करीत होते. आता ही मूठ मी उलटवली आहे. ही मूठ आता हे वाईट कृत्य करणाऱ्या व्यक्तीलाच लागेल. आता ह्या क्षणी ती व्यक्ती रक्ताच्या उलट्या करीत असेल. इशाशेठला आता काहीही धोका नाही असेही फकीराने फर्मावले.

**रहस्यभेद :** अशा रीतीने करणी, मूठ मारणे ह्या खऱ्या म्हणजे थापा असातात. मूठ मारून माणसे मारता येत नाहीत आणि रक्ताच्या उलट्या घडवून आणता येत नाहीत. अनेक मुल्ला/फकीर, भगत मांत्रिक, महाराज लोकांच्या अज्ञानामुळे त्यांची लूट छोट्या मोठ्या चमत्काराने करीत असतात.



वास्तविक पहाता फकीराने लिंबामध्ये अगोदरच इंजेक्शनच्या सिरींजद्वारे मिथील ऑरेंज हे रासायनिक द्रव्य भरून ठेवले होते. अशी अनेक लिंबे महाराजांकडे, बाबा बुवांकडे तयारच असतात. मिथील ऑरेंज हे तांबड्या रंगाचे असते. लिंबू जेव्हा सुरीने कापले तेव्हा रक्तासारखे लाल द्रव्य लिंबू पिळल्यामुळे खाली पडले. जणू काय ते प्रत्यक्ष मूठ उलटली म्हणून घडले असे उपस्थितांना वाटले.

कधी कधी अर्धशिक्षित अडाणी फकीर, भगत हाच प्रयोग चाकूला फणसाचा चीक लावून चाकू सुकवून त्याने लिंबू कापतात. ते पूर्ण पाते लाल भडक दिसते व लिंबातून रक्त बाहेर आल्यासारखे वाटते.

**वास्तव :** इशाशेठ ह्यांना वैद्यकीय तपासाअंती कॅन्सर झाल्याचे आढळले. त्यांचा धंदा पूर्णपणे बसला होता आणि वयात आलेली मुलगी अपंग असल्यामुळे तिचे लग्न कसे होईल याची चिंता होती.

यासर्व गोष्टीतून त्यांना नैराश्येने पूर्ण घेरले होते. आणि दुसऱ्या बाजूला त्यांना कॅन्सरच्या वेदनांमुळे जीवन नकोसे झाले होते. त्यातुनच त्यांना रक्ताच्या उलट्या झाल्या होत्या खाली बसताना घड्याळाला जोराचा झटका बसल्यामुळे घड्याळ बंद पडले होते. ह्या सर्वांचा अर्थ मूठ मारली असा त्यांनी व घरच्यांनी लावला.

◆◆◆



# स्वप्नांचा जाच, नादब्रह्माचा आवाज

डोंबिवली, ठाणे जिल्ह्यातील, कल्याण तालुक्यातील महाराष्ट्रातील एक सुशिक्षितांचे शहर. केवळ ह्याचसाठी हे शहर प्रसिद्ध आहे असे नाही तर ह्या शहराचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे कर्मकांडातून लोकांची लूट करणारे अनेक ज्योतिषी, रेकी मास्टर्स. गल्लोगल्ली आहेत. बुवाबाजीची छोटी-मोठी दुकाने उघडून मृतांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या सुशिक्षितांचे हे शहर.


येथे गल्लोगल्लीत कुडमुड्या ज्योतिष्यांपासून ते संगणकाच्या साहाय्याने कुंडल्या-पत्रिका मांडणारे आधुनिक फलज्योतिषी व हातापासून चेहऱ्यापर्यंत व पुढे पायापर्यंत उभ्या आडव्या रेघांची गणितं मांडून लुटणाऱ्या माणसांचं येथे अमाप साम्राज्य. अशाच तऱ्हेच्या इतर पद्धतीनं छा-छू गिरी करून लूटणाऱ्या एका बाबाच्या मठातील हा चमत्कार. बाबांचे नांव मोठे नामी-चिंताक्रांत झारूळे महाराज. नावांप्रमाणे सदा माणसांना चिंताग्रस्त बनविणारे हे महाराज अनेक चमत्कारांसाठी प्रसिद्ध! येणाऱ्या जाणाऱ्या भक्तगणांचे प्रश्न हातावेगळे करण्याच्या अनेक 'ट्रिक्स' त्यांनी शोधून काढल्या आहेत. त्यातील स्वप्नदोष दूर करण्यासाठी त्यांनी एक नामी शक्कल लढविली आणि त्यातून सुरू झाला नादब्रह्माचा आवाज!

वास्तविक स्वप्ने ही सर्व माणसांना पडतच असतात. सिग्मन्ड फ्रॉईडने स्वप्नांविषयी सविस्तर वैज्ञानिक अभ्यास केलेला आहे. स्वप्ने ही कितीही भीतीदायक असोत की, आनंददायक असोत, त्याचे मनोविश्लेषण करता येते. त्यामागे काही दैवी, अद्‌भूत भविष्याचा वेध किंवा भूतकाळाचा आलेख वगैरे लागू शकतो असे काहीही नाही. कित्येकदा सामान्य माणसांना भीतीदायक, स्वप्ने पडतात व त्यावेळी त्यांचा श्वास रोखला जातो. अशाप्रसंगी माणसे दचकतात, झोपेत ओरडतात रडतात सुद्धा. परंतु ह्या सर्वांची शास्त्रीय कारणमीमांसा करता येते. ती सिग्मन्ड फ्रॉईड या शास्त्रज्ञाने केलेली आहे. हे हे माहित नसल्याने जेव्हा स्वप्नांची मालिका सुरू होते किंवा कधी धक्कादायक स्वप्ने पडू लागतात भुता-खेतांची स्वप्न पडू लागतात तेव्हा माणसे बुवा-बाबा महाराज, भगत, मांत्रिक देवऋषी, मुल्ला फकीर यांच्याकडे धाव घेतात आणि बुवाबाजीची शिकार

बनतात.

अशापैकीच एक तुकाराम इश्वर फोडे. आपल्या पत्नीला धक्कादायक, वाईट स्वप्ने पडून रात्री बेरात्री ती झोपेत ओरडते व दचकून उठते म्हणून एकदा झारूळे महाराजांच्या दरबारात घेऊन गेला. महाराजांनी श्रीमती इश्वरफोडे ह्यांना पाटावर बसण्यास सांगितले. अनेक प्रश्न विचारून स्वप्नांची माहिती समजावून घेतली. नंतर महाराजांनी हातात एक घुंगरू दिले व वाजविण्यास सांगितले. ते वाजले नाही. अनेक प्रयत्न करूनही ते वाजलेच नाही. मात्र तेच घुंगरू महाराजांनी आपल्या स्वत:च्या हातात घेऊन वाजवून दाखविले. तो मंजूळ आवाज म्हणजेच 'नादब्रह्माचा' आवाज.

**दावा :** बाबा असे सांगतो की, नादब्रह्माचा आवाज ऐकला की, वाईट, भीतीयुक्त स्वप्नांची बीमारी दूर होते.



**रहस्यभेद :** बाबा जो घुंगरू हातात देतात ते घुंगरू खडा विरहित असते. म्हणजेच त्यामध्ये असणारा छोटा खडा (बॉल) काढून घेतलेला असतो. त्यामुळेच ते वाजत नाही. परंतु तेच घुंगरू महाराजांच्या हातात मात्र वाजते. खरे म्हणजे जो आवाज भक्त ऐकतो तो आवाज दुसऱ्या घुंगराचा असतो. हे दुसरे घुंगरू महाराजांनी आपल्या झब्ब्याच्या (कफनीच्या) बाह्यांच्या आतमध्ये बांधलेले असते. त्या घुंगरामध्ये खडा असतो आणि ते हाताला बांधलेले असते. त्याच हातात महाराज खडाविरहित घुंगरू धरून वाजवितात. त्यामुळे आपल्याला आवाजाचा भास होतो. ही एक बदमाषी असते. प्रत्येक व्यक्तीला हा चमत्कार वाटतो. कारण जे घुंगरू आपल्या हातात वाजत नाही. ते घुंगरू महाराजांच्या हातात मात्र वाजते. म्हणजे निश्चितच महाराजांना दैवी शक्ती प्राप्त आहे असे वाटते.

◆◆◆



## गुप्त लिखाणाची मोहमाया फुला-फळांच्या रसांची किमया !

जमनाप्रसाद नुकतेच नोकरी करून निवृत्त झाले होते मुंबई सोडून गुजराथमधील आपल्या खेड्यात उर्वरित आयुष्य मजेत घालविण्यासाठी ते निघून गेले होते. मुंबईच्या हवामानात उभं आयुष्यं घालावेलल्या जमनाप्रसादांच्या पत्नी श्रीमती संतोषीबेन यांना गावची हवा काही मानवली नाही. त्या घडी घडी आजारी पडू लागल्या. कुणीतरी सुचवले की गांवापासून जवळच असलेल्या उचाटमाथा ह्या टेकडीवर एक फकीर राहतो, त्याच्याकडे संतोषीबेनला घेवून जा, त्याच्या आशीर्वादाने सर्व काही ठाकठीक होईल.

एके दिवशी जमनाप्रसाद त्यांचा मित्र आणि सोबत संतोषीबेन असे सर्वजण फकीराकडे गेले. खूप गर्दी होती. फकीराच्या आजचा दिवस 'सैतान जिमा' म्हणून ओळखला जायचा फकीर त्या दिवशी फक्त भूताखेतांच्या केसेस हाताळत असे. कधी कधी बाबाकडे 'अल्ला जिमा' 'बिसमिल्ला जिमा' असे दिवस असत. ज्या त्या दिवशी त्या त्या प्रकारचे आजार ऐकून उत्तरे देण्याची त्याची खासियत होती. संतोषीबेनचा नंबर लवकरच लागला. मठात बोलावणं आलं. बाबांनी दुरूनच इशारा केला. बसण्यासाठी फर्मावले. बाबांच्या हातात मोरपिसारा होता. त्यांनी संतोषीबेनच्या चेहऱ्यावरून मोरपिसांचा झाडू फिरवला व तक्रार काय आहे? असे विचारले जमनाप्रसाद सांगू लागल, "कधी कधी अचानक ही अस्वस्थ होते, मनात सतत चिंता, काळजी व हूरहूर सुरू होते. कधी तर हातापायांचा थरकाप होतो व कंप सुटतो. श्वास कोंडल्यासारखा होतो, रात्र रात्र बैचेनीत घालवते. बारीक घाम येतो. कधी चक्कर येते तर कधी छाती धडधडते. कधी कधी सांगते 'मी आता मरणार', तर कधी सांगते, 'माझ्या कुणीतरी वाईटावर आहे'. अनेक डॉक्टरी उपाय केले. रक्त तपासण्या, एक्सरे लघवी तपासणी इ. खूप चाचण्या झाल्या परंतु काहीही आजार सापडत नाही. हिच्या जिवाला आराम नाही. पाण्यासारखा पैसा हिच्यासाठी खर्च झाला. परंतु काहीच फरक पडत नाही. म्हणून तुमच्या आशीर्वादासाठी हिला घेवून आलो आहे. काही बाधा असेल. आमची काही चूकभूल झाली असेल तर समजून घ्या व तेवढा उपाय करा एकदाचा."

महाराजांनी सर्व ऐकून घेतल्यावर जमनाप्रसादांना धीर दिला. लगेच एक कोरा

कागद त्यांच्या हातात दिला. त्यावर संतोषीबेनचे नाव, गाव लिहिण्यास सांगितले. तोच कागद हातात घेऊन त्यांनी जवळच जळत असलेल्या रॉकेलच्या दिव्यावरील आचेवर धरला. क्षणार्धात सर्व अक्षरे 'लालभडक' दिसू लागली. काय होता तो मजकूर? ''तुम्ही निवृत्त झालात, तुमच्या पैशावर, इस्टेटीवर माझा डोळा आहे सावधान !'' हे वाचून जमनाप्रसाद व संतोषीबेन हादरले. त्यांना काहीच सुचेनासे झाले. बाबांनी त्यांना शांत केले. पुन्हा धीर दिला. मजकूराचा अर्थ समजावून सांगितला, तो असा.

**दावा :** तुमच्या वाईटावर तुमचा मुंबईतील पूर्वीचा दोस्त व आत्ताचा शत्रू आहे. त्यांनी संतोषीबेनला 'चेटूक' केले आहे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी थोडा फार खर्च करावा लागेल. त्यामुळेच तुमची पत्नी आजारी आहे. तिला बेचैनी सतावत आहे.

**रहस्यभेद :** अशा रीतीने फुला-फळाच्या रसाने कागदावर अगोदरच आपल्याला हवा तो मजकूर लिहून ठेवून तो कागद उन्हात सुकवून दरबारात येणाऱ्या प्रत्येक गिऱ्हाईकाच्या हातात देऊन आचेवर गरम केल्यास अक्षरे उमटतात. कागद उन्हात सुकवून तयार ठेवल्यानंतर त्यावर लिहिलेली अक्षरे दृष्टीस पडत नाहीत. मात्र कागद गरम केल्यावरच स्पष्टपणे वाचता येतात. म्हणून कोऱ्या कागदावर संदेश आला असा दावा केला जातो. तो फसवा असतो.

विविध तऱ्हेच्या फुला-फळांच्या रसाची किमया:-

१) हातावर (मनगटावर) लिंबाच्या रसाने किंवा कोऱ्या पांढऱ्या कागदावर लिंबाच्या रसाने हवा तो मजकूर लिहून तो सुकू द्यावा. मग हातावरील (मनगटावरील) मजकूर स्पष्ट दिसण्यासाठी एक कागद जाळून त्याची पूड मनगटावरील लिखित भागावर चोळावी. तो मजकूर स्पष्टपणे वाचता येतो. समजा कागदावर मजकूर लिहून कागद सुकवला असेल तर तो कागद ज्योतीच्या आचेवर गरम करावा (जळू देऊनये); सावकाश पणे अक्षरे 'लाल रंगा'ची उमटतील.

२) कोऱ्या कागदावर संत्र्यांच्या रसाने लिहिल्यास व ते सुकवून गरम केल्यास पुन्हा लाल अक्षरे उमटतात.

३) लसणाच्या, कांद्याच्या रसाने लिहून वरील कृती केल्यास तांबडी अक्षरे उमटतात.

४) कागदावर गाईच्या दुधाने लिहील्यास व कागद सुकवून, आचेवर तापवल्यास पिवळी अक्षरे उमटतात.

बाबांनी वरील चमत्कार दाखवून जमनाप्रसादांना आपल्या जाळ्यात फसविले व निवृत्ती नंतरची त्यांची सर्व मिळकत थोडी थोडी करून हडप केली. अनेक उपास-



तापास, पूजा गृहशांती वगैरे प्रकारांनी जमानाप्रसाद पूर्णपणे नागविले गेले. वास्तविक संतोषीबेनची लक्षणे पहाता त्यांना चिंतारोग (एंक्झायटी न्यूरॉसिस) झाला होता. त्यांनी सुरवातीपासून दुर्लक्ष केले व त्यानंतर अनेक बाबा, फकीर यांच्यामागे लागून त्यांना पूर्णपणे नैराश्य (डिप्रेशन) आले. व पुढे पुढे त्यांचा त्रास वाढला. योग्यवेळी त्या एखाद्या मनोविकार तज्ज्ञाकडे गेल्या असत्या तर त्यांना जीवनात सर्वस्व गमावून बसण्याची वेळ आली नसती. वास्तविक त्यांचे सर्व जवळचे नातेवाईक मुंबईत होते. मुले, मुली मुंबईत स्थिरस्थावर झाली होती. म्हातारपणात त्यांना जवळचा कुणी आधार हवा होता. तो नसल्यामुळे अधिक विचाराने त्या दिवसेंदिवस नैराश्येच्या खाईत ढकलल्या गेल्या होत्या. त्यांना कोणीही चेटूक/करणी केलेली नव्हती. कारण अशारीतीने करणी, जारण-मारण, मूठ मारणे, देव-देवस्की करणे कोणालाही करता येत नाही. या केवळ अज्ञानातून आणि भीतीतून निर्माण झालेल्या अंधश्रद्धा आहेत. त्यात काहीही खरेपणा नाही.

◆◆◆

# बाबांच्या हाती मोह माया फुलांची बदली काया !

शिखांचा धर्मगुरू गोविंदसिंग यांचा जन्मदिन साजरा होतो. त्याच वेळी सुवर्ण मंदिरात जशी गर्दी उसळते, तशीच गर्दी वर्षातून एकदाच 'दरबार सिंगाच्या' दरबारात उसळते. कुठे आहे दरबार सिंगाचा दरबार? त्यासाठी जावे लागेल पंजाब मधील अमृतसर पासूनच जवळच असलेल्या 'जिंदानगर' मध्ये. दरबार सिंगचा हा दरबार वर्षातून एकदाच भरतो. त्या दिवशी अनेक शीख लोक आपली गाऱ्हाणी मांडण्यासाठी बाबांच्या दरबारी 'ग्रंथसाहेबांचे पठण' करण्यासाठी व बाबांचा 'दुवा' घेण्यासाठी हजेरी लावतात.

ह्या पवित्र दिवशी सुब्बाराव आपल्या एकूलत्या एक लाडक्या कन्येला घेऊन बाबांच्या दरबारी हजर झाले. ग्रंथसाहेबाचे पठण सुरू झाले होते. त्यानंतर अर्धा तास 'झूला पूजन' नंतर प्रत्येकाची 'तक्रार नोंदपाठ' आणि शेवटी सुरू होतो 'सैतानकी झूला', 'फारूकी, बेला', वगैरे वगैरे. सुब्बारावांचा नंबर दुपारी दोन वाजता लागतो. सुब्बाराव पुढे होतात. दरबारसिंग जोराने बेल वाजवितात. सुब्बारावची कन्या समोर येते. ती अनेक महिने मानसिक दृष्ट्या विकल होऊन आजारी आहे. बाबा विचारतात तेवढ्याच प्रश्नांची उत्तरे द्यायची अशी सक्त ताकीद आहे. बाबांचे सहाय्यक सुब्बारावांना विचारतात.

१) मुलीचे वय काय ?- २० वर्ष

२) किती दिवसांपासून आजारी आहे ? - ७ महिने

३) काय काय त्रास होतो ? - कधी कधी झटके येतात. अंगात येते, बडबडते, पुन्हा शांत होते. पुन्हा एक दोन दिवसांनी बेफान होते भडकते, रडते, पुन्हा शांत होते. आठ पंधरा दिवसांनी पुन्हा अचानक बेशुद्ध होते, हसते, पुन्हा नाचते.

४) काय काय उपाय केले ? - आतापर्यंत अनके डॉक्टरी उपाय झाले. सर्व तऱ्हेच्या तपासण्या झाल्या. वैदू, फकीर, महाराज, भगत, मांत्रिक सर्व उपाय केले. मुलीला काहीही फरक पडत नाही. पुन्हा पुन्हा तोच तोच आजार जडतो. उपचार केले की तात्पुरते बरे वाटते.

महाराजांनी शांतपणे ऐकून घेतले. मुलीच्या हातात फुले दिली व त्यावर मंत्र पुटपुटत पाणी शिंपडले, आणि काय आश्चर्य; त्या सर्व फुलांचा रंग क्षणार्धात बदलला. सर्व



जण थक्क झाले. पुन्हा महाराजांनी शांतपणे त्या मुलीला ती फुले एका पाण्याने भरलेल्या भांड्यात टाकण्यास सांगितले. पुन्हा एक आश्चर्याचा धक्का सुब्बाराव व त्यांच्या पत्नीला बसला. कारण फुलांचा रंग पुन्हा पूर्ववत झाला होता.

**दावा :** दरबारसिंग महाराजांनी सुब्बारावांना सांगितले की, तुमच्या कन्येला बाहेरची बाधा झाली आहे. त्यासाठी मोठा विधी 'सैतानकी झूला' या नावाने करावा लागेल. त्याचा खर्च ५०००/- रुपये पर्यंत येईल. सुब्बाराव सर्व करण्यास तयार होतात.

**रहस्यभेद :** दरबारसिंगाने फुलांचा रंग बदलण्याच प्रयोग केला ती एक रासायनिक प्रक्रिया होती. यास विरंजनाची क्रिया असे म्हणतात. त्याने फुलांवर चुना + नवसागर यांचे पाणी शिंपडले व बघता बघता विरंजन क्रियेने फुलांचे रंग बदलले. जेव्हा पुन्हा त्यांनी ती फुले पाण्यात टाकण्यास सांगितली तेव्हा पुन्हा त्या फुलांना पूर्ववत रंग प्राप्त झाला. कारण पाण्यामुळे फुलांच्या विरंजनाची क्रिया पुन्हा उलटी झाली व त्यांना पूर्ववत रंग प्राप्त झाला. काही फुलांच्या विरंजनाच्या क्रिया पुढे दिल्या आहेत. अशा तऱ्हेच्या अनेक क्लृप्त्या अनेक फकीर मुल्ला, भगत, देवऋषी, महाराज करतात व लोकांना लुटतात.



१) डाळिंबाच्या कळीला गंधकाची धुरी दिली असता तिचा रंग पांढरा होतो.

२) पांढऱ्या फुलांना जर गंधकाची धुरी दिली तर ती पिवळी होतात. पिवळ्या फुलांना धुरी दिली तर ती पांढरी होतात.

३) लाल रंगाच्या कण्हेरीच्या फुलांना गंधकाची धुरी दिल्यास ती पांढरी होतात आणि पुन्हा त्यावर तुरटीचे पाणी शिंपडल्यास ती पूर्ववत होतात.

४) गुलाबाच्या फुलांना गंधकाची धुरी दिल्यास त्यांचा रंग निळा होतो. तुरटीच्या पाण्यात बुडवल्यास ती पूर्ववत होतात.

**वास्तव :** सुब्बाराव यांची कन्या ही २० वर्षाची होती. ती वयात आल्यानंतर तिच्या शरीरात काही शारीरिक व मानसिक बदल घडतात. त्याचवेळी तिचे एका व्यक्तीवर प्रेम जडले होते. परंतु नोकरी निमित्त ती व्यक्ती जेव्हा परगावी गेली तेव्हा तिला मानसिक त्रास होऊ लागला. काही मनोविकार ठराविक कालमर्यादेत पुन्हा पुन्हा होतात. हे तिच्या लक्षणांवरून दिसून येते. त्यास 'पिरीऑडिक सायकोसिस' असे म्हणतात. काही आजार विशिष्ट वातावरणात मानसिक ताण वाढल्यावर होतात. मग कधी अमावास्या तर कधी पौर्णिमेला हे आजार जोर करतात असा गैरसमज वाढतो. खरे म्हणजे हे सर्व आजार 'मॅनिक डिप्रेसिव्ह सायकोसिस' मध्ये मोडतात. ते परत परत घडतात, थांबतात पुन्हा सुरू होतात. अशा वेळेला शास्त्रीय ज्ञान नसल्यामुळे दैवी कोप, करणी, दृष्ट लागणे, कुणीतरी काळी जादू केली आहे, आत्मा भटकतो, वगैरे गैरसमज लोक करून घेतात. सुब्बारावच्या कन्येला अशीच काही तरी बाधा आहे ह्या अंधश्रद्धेने पछाडलेले होते. शेवटी मनोविकार तज्ज्ञाने त्यांची मुलगी या संकटातून वाचविली.

◆◆◆



# मनकवड्याच्या करामती भल्याभल्यांची होते गुंग मती !

मनकवड्या ही महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जातीतील एक व्यक्ती. त्यात गोंधळी, टकारी वगैरे जातीपैकी काही व्यक्ती आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अनेक तऱ्हेच्या क्लृप्त्या शोधून काढतात. ही सर्व मंडळी प्रामाणिकपणे परंपरा गावगाड्याचा पद्धतीनुसार टिकवून आहेत. परंतु ह्या व्यक्तींची ही किमया काही मुल्ला, फकीर, पाद्री, ज्योतिषी, भगत, महाराज यांनी उचलली व स्वतःची एक दैवी शक्ती, ईश्वरी देणगी म्हणून ख्याती करून घेतलेली आज दृष्टीस पडते.

या खरे म्हणजे 'टेलीपथी' ह्या प्रकारात मोडणाऱ्या 'ट्रिक्स' असतात. परंतु अनेक भामटे ह्यालाच एक शक्ती मानून लोकांची लूट करतात व चमत्काराच वलय निर्माण करतात.

सोनपूरला एकदा असाच एक कुडमुड्या ज्योतिषी गावात कधी संकष्टी कधी एकादशी सांगत, माधुकरी मागत फिरत होता. कुणी त्याला ओट्यावर बसवून भविष्य पहात होता. तर कुणी तरुणी आपल्या प्रेमवीराचे कसे काय चालले असेल? याची खबरबात विचारत होती. त्या दिवशी एके ठिकाणी गावात महिलांची बैठक चालू होती. बैठकीत एक महिला अध्यात्माचे डोस बाया बापड्यांना पाजीत होती. तितक्यात मनकवड्याही तेथे आला. थोडा थबकला. कुणीतरी या बसा, म्हणून फर्मावले. मनकवड्याने आपले बस्तान बैठकीत मांडले. 'बैठकीतील अध्यात्म पुराण' संपले. चहापाणी सुरू झाले. मग एक तिशीतल्या बाईने मनकवड्याला स्वतःच्या मनातली हूरहूर ऐकवली व त्यावर इलाज काय म्हणून विचारले. मनकवड्याने लगेच बाईला साधक बाधक उत्तर दिले. मग एकीमागून एक प्रत्येक जण आपापल्या मनातील शंका कुशंका विचारू लागल्या. मनकवड्याला सर्वांना एकदम उत्तरे देणे शक्य नव्हते. तो म्हणाला की, ''तुमच्या मनातील शंका कुशंका एका कागदांवर (चिठ्ठीवर) चार/पाच शब्दात लिहा. तुमचे नावही चिठ्ठीवर लिहा त्या चिठ्ठ्या माझ्याकडे द्या. मी चिठ्ठ्या बंद असतानासुद्धा तुमच्या मनातली खंत ओळखेन व त्याचे उत्तर देईन.''

सर्वजणींनी कागदाचे चिठोरे हातात घेतले. ज्या शिक्षित होत्या त्यांनी त्वरित

दुसरीकडून पेन घेऊन चार-पाच शब्दात आपल्या मनातील इच्छा लिहिली. ज्यांना लिहीता वाचता येत नव्हते, त्यांनी आपली चिठ्ठी दुसरीकडून लिहून घेतली. सर्वजणींनी चिठ्ठ्यांच्या घड्या घालून मनकवड्याच्या हातात दिल्या. मनकवड्याने एक चिठ्ठी कानाला लावली व जाहीर केले, ''त्यात 'पतिराज घरी कधी येतील?' असे लिहिले आहे. 'ठमामावशी' असेही चिठ्ठीवर लिहिले आहे. कोण ठमामावशी?''सगळ्यांच्या नजरा ठमामावशीवर खिळतात. त्यानंतर कुडमुड्या मनकवड्याने ''लवकरच येतील, चिंता नसावी'' असेही सांगितले. त्यानंतर दुसरी चिठ्ठी उचलून कानाला लावली व तीही न बघता न वाचता, ''मुलीचे लग्न कधी होईल? -लताबाई'' असे जाहीर केले. लताबाई उभ्या राहिल्यि. सर्वजणी अवाक झाल्या. मनकवड्या म्हणजे त्यांच्या दृष्टीने साक्षात परमेश्वरच अवतरला असे त्यांना वाटले. प्रत्येक चिठ्ठीगणिक उत्सुकता वाढत गेली. सर्वजणींच्या चिठ्ठ्या ओळखल्यानंतर सगळ्याजणी मनातल्या मनात सुखावल्या. त्यांनी काही रक्कम स्वखुशीने मनकवड्याला दिली.

**दावा :** येथे मनकवड्या कधी ही स्वत:हून आपल्याकडे दैवीशक्ती आहे असे दावा करीत नाही. परंतु लोकच त्याच्याकडे दैवीशक्ती आहे असे मानतात. हीच ट्रिक करून काही बुवा पण आपल्या भक्तांना गंडवतात.

**रहस्य :** मनकवड्याने जेव्हा कागदावर 'आपल्या मनातील शंका/प्रश्न लिहा, असे म्हटले त्याच वेळी त्याने आपल्याच ओळखीच्या ठमामावशीचा एजंट म्हणून वापर केला. त्या दिवशी मनकवड्या स्वत:हून तेथे आला नव्हता. ह्या अध्यात्मिक बैठकीची माहिती ठमामावशीनेच आदल्या दिवशी मनकवड्याला दिली होती. दोघांनी मनोमन ठरवून हा चिठ्ठ्यांद्वारे मनातले ओळखण्याचा चमत्कार सादर केला. पहिली चिठ्ठी जेव्हा मनकवड्याने उचलली ती खरे तर लताताईंची होती. परतुं त्या चिठ्ठीसाठी त्याने ठमामावशीला अगोदर सांगितल्याप्रमाणे तिने साथ द्यायची ठरले होते. त्यानुसार मनकवड्याने चिठ्ठी लताताईंची असतानासुद्धा बळेबळेच कानाला लावली व जणू काय मला अंर्तज्ञानाने तुमच्या मनातले ओळखता येते असे नाटक केले व ठमामावशीचे नाव पुकारले. त्यांची इच्छा जाहीर केली. ठरल्याप्रमाणे ठमामावशी उभ्या राहिल्या. नंतर चिठ्ठीतले शब्द बरोबर आहेत का? ते पाहण्यासाठी चिठ्ठी उघडली व त्या चिठ्ठीवरील मजकूर वाचून तो मनात ठेवला. त्यानंतर दुसरी चिठ्ठी उचलली. ती कानाला लावली. नुसतीच तोंडाने थोडी सौम्य आवाजात बडबड



केली. त्या चिठ्ठीसाठी अगोदर वाचून मनात ठेवलेला मजकूर जाहीर केला. तो मजकूर लताताईंचा होता. त्या उभ्या राहिल्या. त्यांच्या शंकेचे निरसन केले. पुन्हा चिठ्ठी उघडली. त्यावरचे प्रश्न / शंका मनातल्या मनात वाचून घेतल्या. आणि पुन्हा तिसरी चिठ्ठी उचलली व तिच्यासाठी अगोदरचा मजकूर जाहीर केला. अशाप्रकारे सर्व चिठ्ठ्या ओळखल्या.

◆◆◆

# मनकवड्या हिकमती अजब त्याच्या करामती ?

तीसगाव, ठाणे जिल्ह्यातील एक गाव. गांवात मध्यवर्ती एक मैदान. मैदानात गावची यात्रा भरते. धंदेवाल्यांची विविध दुकाने आणि पंचक्रोशीतील सगे-सोयऱ्यांची एकच गर्दी यात्रेला जमते.

याच यात्रेत विविध तऱ्हेचे भविष्य सांगणारे ज्योतिषी आणि विविध तऱ्हेचे खेळ करून दाखविणारे कलाकार हजेरी लावतात. अशा एका यात्रेच्या वेळी एका ठिकाणी मोठी गर्दी जमा झाली होती. एक तीस-पस्तीस वयाचा तरुण व सोबत ८-१० वर्षाचा मुलगा यांचा खेळ सुरू होता. प्रत्येक जण छोट्या मुलाच्या कानात आपला शब्द सांगत होता. शब्द ओळखल्यावर एक रुपया छोट्या मुलाच्या हातावर लोक ठेवत होते. हा एक रुपया म्हणजे आपल्या मनातला शब्द अचूक ओळखला म्हणून 'बिदागी' द्यायची असे सुरू होते. बघता बघता खेळ रंगात आला. प्रत्येकाला आपण आपल्या मनातला शब्द जाणून घेवू अशी उत्सुकता होती. मी ही माझ्या शब्दाची परीक्षा मनकवड्याद्वारे करून घेण्यासाठी पुढे सरावलो. मी मुलाच्या कानात माझा शब्द सांगितला. मुलाने व वडिलांनी आपली तोंडे विरूद्ध दिशेला केली. मुलगा मोठ्या मोठ्याने अनेक शब्द बोलू लागला. उदा. केस, कंगवा, खुर्ची, रूमाल, लग्नपत्रिका, पेन इत्यादी असे १५/१६ शब्द बोलून झाल्यावर त्याने लग्नपत्रिका हा माझा शब्द अचूक सांगितला मी शांतपणे एक रुपया मुलाच्या हातावर ठेवून शांतपणे बाजूला गर्दीत उभा राहिलो. साधारण अर्ध्या पाऊण तासातच १००/१२५ लोकांनी आपला शब्द मनकवड्यांच्या द्वारे जाणून घेतला. एव्हाना दुपारचे २ वाजले होते. मनकवड्याने खेळ बंद केला व जेवणासाठी एक तास खेळ बंद राहील असे जाहीर केले.

मी सर्व खेळ थाबंल्यावर मनकवड्याशी मनसोक्तपणे बोललो. त्यांनी सांगितले की आमचा हा वंशपरंपरागत धंदा आहे. वर्षभर महाराष्ट्रात कुठे ना कुठे तरी यात्रा ही चालूच असते. जेव्हा यात्रांचा हंगाम नसतो, तेव्हा आम्हीच माकड, अस्वल वगैरे घेऊन गावोगांव भटकंती करतो. माकडांचे, किंवा अस्वलाचे खेळ दाखवून नंतर 'मनकवड्या करामती' करतो. जे काही पैसे मिळतात त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा गुजारा चालतो. हे लोक ज्योतिष देखील सांगतात.



**दावा :** ''मनातले ओळखण्याची ही देणगी इश्वरी कृपेने आमच्या घरात चालू आहे.'' असे सांगून तो पुढे म्हणतो,'' खरे म्हणजे यात दैवीशक्ती वगैरे काही नाही यात आम्ही आमचे डोके वापरतो व दुसऱ्याच्या मनातील ओळखतो.''

**रहस्य :** मुलगा व बाप ह्यांनी एक ठराविक शब्द खूण म्हणून ठरविलेला असतो. उदा. 'रुमाल'. मुलगा नेहमी ह्या शब्दानंतरच त्याच्या कानात लोकांनी सांगितलेला शब्द उच्चारतो व माग-पुढे इतर शब्द टाकतो. त्यामुळे ओळखणे सोपे होते.

◆◆◆

# महाराज फारच अंतर्ज्ञानी चलनी नोटांचे नंबर जाणी

महाराजांची सत्संगी बैठक इगतपुरीला होती. अशी बैठक रोज एका गावाहून दुसऱ्या गावी मजल दरमजल करीत चालू असते. हल्ली सत्संगी बैठकांचे जणू पीकच आले आहे. बैठकीत भावगीते पण आधुनिक सिनेमांतील गाण्यांच्या चालीवर होतात. त्यामुळे तरुण-तरुणींना शिकार म्हणून गाठण्यासाठी चांगलीच नामी युक्ती ह्या बैठक बहादुरांनी शोधून काढली आहे.

एकूण काय सगळ्या सुशिक्षित,अशिक्षित, उच्च शिक्षित, अर्धशिक्षित, अडाण्यांच्या बुद्धीचा पुरा 'बोन्साय' बनविण्याचा उद्योग सर्वत्र चालू आहे. त्यातुनच एकेक नामी शक्कल लढवली जाते. त्यांची विचारशक्तीच मारली जाते. विचारशक्तीच मारली की प्रयत्नवाद खुंटीला बांधून ठेवून माणसे 'नशीब' नावाच्या फसव्या गोष्टींच्या आहारी जाऊन नको तितकी दैववादी बनतात व जीवनातून उद्ध्वस्त होतात.

या सत्संगी बैठकीत अध्यात्माचे कडू-गोड डोस पाजले जातात. तासाभरात हा कार्यक्रम आटपतो. त्यानंतर वैयक्तिक अडअडचणींवर 'हुकमी इलाज' सांगण्यास सुरुवात होते. कुणाचे लग्न जमवायचे असते. कुणाला कपाटापासून फ्रीजपर्यंत आणि नांगरापासून म्हशीपर्यंतची करायची खरेदी असते. हे सर्व महाराजांच्या सल्ल्यानुसारच व्हायला हवे अशी इच्छा असते. अन्यथा आपत्ती ही आलीच समजा.

जयंत नाईकनवरे हेही साप्ताहिक बैठकीत नेहमी हजेरी लावीत. महाराजांची महती गांवोगावी पोचवणाऱ्या अनेक एजंट भक्तांमध्ये जयंत नाईकनवरे नेहमी आघाडीवर. एकदा नाईकनवऱ्यांना महाराजांच्या अगाध शक्तीची कल्पना आली. महाराजांनी त्यांच्याकडून शंभर रुपयाचीं नोट मागितली. त्यांनी लगेच खिशातून नोट काढली. ते ती महाराजांना देऊ लागले. परंतु महाराजांनी ती नोट आपल्या परमप्रिय अशा एका भक्ताच्या हातात देण्यास सांगितली. महाराजांनी डोळे घट्ट बंद करुन घेतले व एक हात आपल्या परमप्रिय शिष्य भरत शेट्टी ह्याच्या तोंडावर ठेवला आणि बघता बघता बाबाने एकेक अंक भराभर सांगितला. नाईकनवऱ्यांनी ते अंक कागदावर लिहिले. महाराज थांबले. तोंडावरुन हात काढला. भरत शेट्टीने जयतांना नोट परत केली व नोटेवरील क्रमांक तपासण्यास सांगितले. नोटेवरील क्रमांक महाराजांनी अचूक सांगितला होता.



ह्या एका गोष्टीमुळे नाईकनवऱ्यांची श्रध्दा महाराजांवर पक्की झाली.त्यांनी आपले सर्वस्व महाराजांच्या चरणी अर्पण केले.

**दावा :** भक्तांना अशा फसव्या कृतीतून चमत्काराची प्रचीति दिल्यामुळे भक्तच मग महाराजांच्या नावाने अनेक अफवा पसरवितात. कुणी सांगतात महाराजांना त्रिकाल ज्ञान प्राप्त झाले आहे. तर कुणी सांगतात महाराज 'संत' पदाला पोहचले. प्रत्यक्ष परमेश्वर त्यांच्या तोंडून बोलतो. महाराजांना दैवी शक्ती प्राप्त झाली आहे वगैरे वगैरे

**रहस्यभेद :** महाराज व त्यांचा परमप्रिय शिष्य ह्या दोघांच्या संगनमताने अशी बदमाषी करणे शक्य असते. ज्या क्षणी नोट भरत शेट्टीच्या हातात दिली त्यावेळी त्याने नोटेवरील क्रमांक व्यवस्थित नजरेत भरला व लक्षात ठेवला. महाराजांनीही त्या अगोदरच डोळे घट्ट बंद करून घेतले. त्यामुळे त्यांना क्रमांक दिसण्याची सूतराम शक्यता नव्हती. परतुं महाराजांनी प्रत्येक क्रमांक बरोबर जाणून घेण्यासाठी आपल्या स्वतःच्या हाताचा पंजा शिष्याच्या तोंडावर ठेवला होता. भरत शेट्टी नोटेवरील एकेक क्रमांक लक्षात घेवून तोंडावर ठेवलेल्या महाराजांच्या हाताच्या पंज्याला स्ततःच्या जिभेने स्पर्श करी. समजा ४ क्रमांक आहे. तर महाराजांच्या पंजाला भरत शेट्टी ४ वेळा स्पर्श करी. महाराज त्यावरून तो क्रमांक सांगत.

अशा तऱ्हेने महाराजांनी संपूर्ण क्रमांक सांगितले. अशा रीतीने महाराजांचे दलाल महाराजांना अनेक कामात मदत करीत असतात. त्यामुळेच अगदी कमी कमी अवधीत एखादा फाटका महाराज पण लोकांच्या गळ्यातील ताईत बनतो.

◆◆◆

# बाबांना प्रसन्न झालाय जटाधारी अवतरली गंगा पृथ्वीवरी

एके दिवशी निफाड ह्या नाशिक जिल्ह्यातील तालुक्याच्या गावी काशीहून सोमेश्वर महाराजांच्या रथाचे आगमन होते. सोबत इतर ८ ते १० सेवकांचा चमू असतो. रथ आंबेडकर पुतळ्यासमोर येऊन थांबतो. सेवक ध्वनिक्षेपकावरून महाराजांच्या आगमनाची घोषणा करतात. महाराजांच्या रथा सोबत एक बंद पेटारा असलेली बैलगाडी असते व त्या गाडीत एक विचित्र गाय असते. गाईच्या शारीरिक रचनेत जन्मापासूनच गुणसूत्रांच्या चुकीच्या फलन पद्धतीमुळे व्यंग निर्माण झाले होते. तिला गळ्यात एक पाचवा पाय होता. दोन तोंडे होती. धड मात्र एकच होते. बघता बघता ह्या पवित्र गोमातेला बघण्यासाठी गावकऱ्यांनी रांगा लावल्या. जवळच घोड्याच्या रथात सोमेश्वर महाराज पहुडले होते.

मधूनच रथाला बांधण्यात आलेल्या ध्वनिक्षेपकांच्या भोंग्यातून गोमातेच्या जन्माची आख्यायिका व महाराजांच्या लीलांची टेप ऐकवली जात होती. महाराजांचे सेवक 'सोमेश्वर महाराज की जय' अशा घोषणा देत होते. मध्येच महाराज उठले. गोमातेचे दर्शन थांबविण्यात आले. महाराजांनी जनसमुदायाला शांत होण्याचा इशारा केला. लगेचच महाराजाचे प्रवचन सुरू झाले. शांती, सुख व समाधान प्राप्ती साठी, जीवनात यशस्वी होण्यासाठी धर्माची शिकवण कशी उपयुक्त आहे.असे सांगून नीतीचे चार दोन डोस पाजत. नंतर महाराज आपल्या हातातून गंगा सुरू करीत. प्रत्येक जण महाराजांच्या हातातून पडणारी गंगा दोन्ही हाताने घेवून पित असे. महाराजांच्या पवित्र गंगेचे पाणी प्राशन करण्यासाठी प्रचंड मोठी रांग लागे. तासाभरांत आख्खे गांव या चमत्कारांच्या अध्यात्म गंगेत न्हाऊन निघाले.

**दावा :** सोमेश्वर महाराजाच्यां कृपाप्रसादाने अनेकांच्या व्यथा दूर होतात. महाराजाच्यां कृपाप्रसादाने ही गाय 'गोमाता' म्हणून जन्माला आली. महाराजांच्या कृपाप्रसादाने अनेक निपुत्रिकांना पुत्र लाभ झाला आहे. महाराज साक्षात गंगा पृथ्वीवर आणू शकतात.

**रहस्यभेद :** महाराज आपल्या हातातून गंगा निर्माण करण्यासाठी आपल्या भगव्या कफनीच्या (झब्ब्याच्या) आतमध्ये काखेत दोन्ही बाजूला प्लॅस्टीक बाटलीत पाणी





भरून ठेवत. त्या बाटलीला एक रबरी नळी घट्ट बसवून रबरी नळीचे दुसरे टोक दोन्ही हाताच्या पंजाजवळ कफनीच्या आतून आणलेले असे. प्रत्येक वेळी काखेत हाताने दाब निर्माण करून रबरी नळीद्वारे लोकांच्या हातावर दोन तीन थेंब देत असत. तेच पाणी गंगा म्हणून लोक प्राशन करून धन्य धन्य होत होते. अशा प्रकारे ही बदमाशी चाले.

◆◆◆

# फोटोतूनी विभूती सत्य साईची ख्याती

सूरजमल अम्मा आपल्या शेजारच्या गंगूबाईना सांगत होती, ''अहो गंगूबाई तुम्हाला आपल्या वाडीतील गंपूशेठकडे काय घडलं माहीत आहे कां? कालपासून म्हणे त्यांच्या घरी असलेल्या सत्यसाईबाबाच्या फोटो फ्रेम मधून भस्म पडू लागले आहे. दर्शनासाठी प्रचंड गर्दी जमा होत आहे. आपण सुद्धा दोघीजणी जाऊन येऊ, बाबांच्या फोटोचे दर्शन घेऊ !''

महाराष्ट्रातच नव्हे तर जगभर अशा पद्धतीने कधी मूर्तीतून, कधी फोटोफ्रेममधून कधी कुंकू, तर कधी भस्म, हळद, बुक्का जमा होतो. आणि मग एकच चर्चा सुरू होते की, मारूतीला घाम येऊ लागला. किंवा कधी कधी भिंतीला टेकून असलेल्या एखाद्या देवीच्या मूर्तीच्या डोळ्यातून पाणी येताच लोक सांगू लागतात की देवी रडते आहे. कधी कधी गावच्या देवीला, मारुतीला खंडोबाला, देवीचा आजार झाला आहे, अशा अफवाही पसरतात. कुठे कुठे तर शंकराच्या फोटोफ्रेममधून गंगा अवतरते. असे एक ना अनेक चमत्कार ऐकण्यास व पाहण्यास मिळतात.

वरील सर्व प्रकारात एकतर बदमाषी ही असतेच परंतु कधी कधी रासायनिक पदार्थांचा वापर सफाईने करण्यात आलेला असतो. कधी कधी मूर्तीवर वर्षानुवर्षे शेंदराचे जे मूलामे चढून त्याला पापुद्रे असतात त्यात हवा जमा होते व तेथे फुगवटे दिसतात. त्यालाच देवीला किंवा देवाला देवी आल्या असे म्हटले जाते.

**दावा :** सत्यसाईबाबा प्रसन्न झाला आहे किंवा देव देवता कोपल्या आहेत त्या चमत्कार घडवून लोकांना प्रचिती देतात. कारण हल्ली भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, खूप वाढले आहेत. लोक पाप करू लागले आहेत.

**रहस्यभेद :**

१) सत्यसाई फोटोफ्रेम कधी कधी ॲल्युमिनियमची बनलेली असते किंवा त्या फ्रेमच्या फोटोच्या मागे ॲल्युमिनियमच्या पट्ट्या मर्क्युरीक क्लोरॉईड लावून लपवितात. किंवा फ्रेमलाच हे रसायन लावले जाते. ह्या पट्ट्या किंवा फ्रेम जेव्हा फोटोसमोर जळणाऱ्या पणतीने किंवा बल्बने गरम होतात, तेव्हा त्यामधून मंद ज्वलनाची क्रिया होऊन ॲल्युमिनियममधून राख बाहेर पडते. ती सत्यसाईची किमया नसते तर ती साधी



रासायनिक प्रक्रिया असते.

२. कुंकू, हळद, बुक्का तर चक्क घरातीलच लोक मूर्तीसमोर/फोटोफ्रेमसमोर ढीग करून ठेवतात व फोटोफ्रेम, मूर्तीतून बाहेर आले असे खोटेच जाहीर करतात.

३. मारुतीच्या फोटोफ्रेमवर पाणी जमा होणे यामध्येदेखील काचेला कॅल्शियम क्लोराईड हा पदार्थ किंवा लॅक्टीक ॲसिड लावून ठेवतात. कॅल्शियम क्लोराईड व लॅक्टीक ॲसिड हे पदार्थ आर्द्रता शोषक आहेत ते हवेतील बाष्प शोषून घेतात. ते काचेवर किंवा फ्रेमवर जमा होते. यालाच 'मूर्तीला घाम आला' असे म्हटले जाते.

४. एकदा तर चक्क देवाची मूर्ती भिंतीला चिकटलेली होती. पावसाळ्यात मागच्या बाजूने भिंत पूर्णपणे पावसाच्या पाण्यात भिजली होती. आणि त्यातील पाणी झिरपून मूर्तीच्या कधी नाका-तोडांतून, तर कधी कधी डोळ्यातून बाहेर येऊ लागले होते. त्यावर लोक म्हणू लागले की, मूर्ती रडते आहे.

अशा रीतीने प्रत्येक वेळी प्रत्येक घटनेला वेगळे शास्त्रीय कारण असते. ते शोधले म्हणजे चमत्कारातील फोलपणा उघडा पडतो.

◆◆◆

# किती भाऊ–बहिणी सांगू तुमच्या कानी

भिवंडी शहर अमाप लोकसंख्येने गजबजलेले. त्या शहरातील एक मुस्लीम फकिराने भिवंडीच्या आजूबाजूच्या खेड्यात एकदा असाच हंगामा केला. फकीराने कामतघर गावातील चार/सहा कुटुंबांना चांगलाच फटका दिला व त्यांच्याकडून पैशाची बरीच लूट केली. त्याचे झाले असे की, फकीर एके दिवशी गावात आला आणि त्याने काही ओळखीच्या कुटुंबाकडे बैठक बसवली आणि गावातील चार-सहा कुटुंबांतील भाऊ-बहिणी किती? मृत भावंडे किती? हे अचूक सांगितले.

त्यासाठी त्याने एका कुटुंबातील एका व्यक्तीला एका कागदावर काही प्रश्न विचारून त्यांची उत्तरे लिहिण्यास सांगितली व शेवटची संख्या विचारून केवळ त्या संख्येवरून बहीण-भाऊ जिवंत किती व मृत किती ते सांगितले.

**प्रश्न :**

जिवंत भावांची संख्या लिहा ( समजा - २)
त्या संख्येला २ ने गुणा ( २ x २ = ४)
त्या संख्येत ३ मिळवा ( ४ + ३ = ७)
त्या संख्येला ५ ने गुणा ( ७ x ५ = ३५)
त्यात जिवंत असलेल्या बहिणींची संख्या मिळवा (समजा ३) म्हणजेच ३५+३=३८)
त्या संख्येला १० ने गुणा ( ३८ x १० = ३८०)
त्या संख्येत मृत भावंडांची संख्या ( समजा २) म्हणजेच ३८० + २ = ३८२ )
त्या संख्येत एक मिळवा - ( ३८२ + १ = ३८३)

फकीराने एकूण बेरीज विचारली ती ३८३ आली

फकीराने मनातल्या मनात काहीतरी आकडेमोड करून जिवंत भाऊ-बहिणी व मृत भावंडे किती ते अचूक सांगितले.

**दावा :** अल्लाच्या कृपेने फकिराला मनातले अचूक ओळखता येते.

**रहस्यभेद :** फकिराने शेवटची संख्या विचारली ती होती ३८३ त्यातून (मनातल्या मनात) १५१ वजा केले. ३८३-१५१ = २३२. २३२ मध्ये डावीकडील संख्या २ ( म्हणजे जिवंत भाऊ) मधला ३ हा अंक म्हणजे जिवंत बहिणी. उजवीकडचा शेवटचा



अंक २, ही मृत भावंडांची संख्या.

**सूचना :** प्रत्येक वेळी १५१ हीच संख्या वजा करावी. यात देखील कधी बेरीज, कधी गुणाकार, तर कधी वजाबाकी करून ह्या गुंगाऱ्याने फसवले जाते.


◆◆◆

# योगिक शक्तीचा दावा नाडी बंद पाडण्याचा कावा

गुंडेवार महाराजांच्या मठात आषाढी एकादशी निमित्त कीर्तन-प्रवचनाची पारायणे सकाळच्या काकड आरतीने सुरू झाली. पुढे गुंडेवार महाराजांची कीर्तने-प्रवचने संबंध परिसरातील गावांतून सुरू झाली. एके दिवशी कीर्तन रंगले होते. प्रचंड गर्दी मंडपात जमा झाली होती. कीर्तन संपले. भक्तगण महाराजांच्या दर्शनासाठी लोटांगणे घालू लागले.

तितक्यात ध्वनिक्षेपकावरून घोषणा करण्यात आली की, महाराज आता समाधिस्त होणार आहेत. तरी सर्व भक्तांनी आपापल्या जागेवर बसावे. बघता बघता महाराजांची समाधी लागली आणि महाराजांच्या नाडीचे ठोके बंद पडले. काही भक्तांनी जवळ जाऊन महाराजांची नाडी तपासली. परंतु नाडी चक्क बंद आढळली.

त्यानंतर महाराजांची थोरवी सांगणारे टेप केलेले प्रवचन ऐकवण्यात आले लोक शांत पणे सर्व ऐकत होते. महाराजांच्या योगिक शक्तीची भलावण करीत होते.



**दावा :** योगिक शक्तीने हृदयाचे ठोके नाडी बंद पाडता येते. महाराजांचा देह (शरीर) जरी पृथ्वीवर समाधी अवस्थेत असले तरी ते प्रत्यक्ष स्वर्गात प्रवेश करतात.

**रहस्यभेद :** बाबांनी आपल्या काखेत बटाटा ठेवला होता. दंडाच्या दाबाने डाव्या हाताकडे येणाऱ्या रक्तवाहिनींवर दाब पडतो व क्षणभर रक्त प्रवाह थांबल्यामुळे प्रत्यक्षात काहीक्षण नाडीचे ठोके बंद झाले. स्पर्श करताच ते जाणवले नाहीत. ह्यालाच महाराजांची समाधी लागली आहे असे नाव देण्यात आले. ही एक हातचलाखी, बदमाषी असते. असे प्रयोग आपणही करू शकतो.

◆◆◆



# नुसत्या पाण्याने राखेतून अग्नी फुले

बेलापूरच्या सदानंद फुलकवडे महाराजांची ५०वी पुण्यतिथी होती. गावाला जणू जत्रेचे स्वरुप प्राप्त झाले होते. घरोघरी गुढ्या, तोरणे, गावात कमानी उभारल्या होत्या. फुलकवडे महाराजांच्या समाधीसाठी भव्य रोषणाई करण्यात आली होती. दरवर्षी महाराजांची पुण्यतिथी उत्साहाने साजरी केली जाते. या वर्षी ५०वी पुण्यतिथी असल्यामुळे दिवसभर विविध कार्यक्रमांची रेलचेल होती. त्यानिमित्ताने काशीहून दिव्याग्नी महाराजांना बोलवण्यात आले होते. दिव्याग्नी महाराजांनी होमहवन व शांती यज्ञाची जय्यत तयारी केली होती. दिव्याग्नी महाराजांची ख्याती अशी की ते नुसत्या पाण्याने यज्ञ पेटवितात; राखेवर पाणी ओतून शांतीयज्ञ प्रज्वलित करतात.

सकाळी १० वाजता यज्ञादी क्रियाकर्म सुरू झाले. महाराजांनी यज्ञाच्या कुंडात एका मागून एक आहुती दिली. त्यात राख ही ठेवली. नंतर महाराजांचा मंत्रोच्चार जोराने सुरू झाला. पाणी शिंपडले आणि क्षणार्धात यज्ञ पेटला. भक्तगणांनी दिव्याग्नी महाराजांचा फुलकवडे महाराजांचा जयजयकार केला. कार्यक्रमानंतर सामुदायिक प्रार्थना, व त्यानंतर महाप्रसाद दिला गेला. या सर्व प्रकारामध्ये लाखभर रुपयाची धुळदाण झाली.

**दावा :** पूर्वी फुलकवडे महाराजदेखील पाण्याने अग्नी पेटवित असत. ते मरण्यापूर्वी त्यांनी दिव्याग्नी महाराजांना ही दीक्षा दिली त्यामुळेच दिव्याग्नी महाराज पाण्याने राख पेटवितात, असे लोक सांगू लागले होते.

**रहस्यभेद :** महाराजांनी होम हवन करण्यासाठी अनेक यज्ञादी साहित्य घेतले होते. त्यात 'गॅसपत्थर' म्हणजे 'सोडियम' धातूचा खडा लपवून राखेत टाकल्यानंतर त्यावर मंत्रोच्चार करतांना पाणी शिंपडले त्यामुळे सोडियमने त्वरित पेट घेतला. त्यामुळे यज्ञवेदीतील इतर वस्तूदेखील पेटल्या. जणू काय महाराजांनी पाण्याने यज्ञ पेटविला असा भास निर्माण झाला.

खरे म्हणजे सोडियम धातू जर पाण्याच्या संपर्कात आला तर तो पेट घेतो. त्यामुळे सुरक्षितता म्हणून तो नेहमी रॉकेल (केरोसीन) मध्ये बुडवून ठेवतात.

◆◆◆

# अंगावर टोचूनी लिंबू/फुले चमत्कार म्हणती तयाला 'खुळे'

नाशिकचा कुंभमेळा पहावयास गेलो. कुंभमेळा दर बारा वर्षातून एकदा भरतो. सबंध भारतभरातून लोक या सुवर्णमुहुर्तावर अंघोळ करण्यासाठी येतात. का? तर पापांतून मुक्त होण्यासाठी.

अशाच एका कुंभमेळ्यात एक महाराज सगळ्या शरीराला भस्म लावून व दंडाला आणि कपाळाला आडवे-उभे गंध फासून संपूर्ण शरीरावर गुलाबाची फुले सुई-धाग्याने टोचून लटकवत भिक्षा मागत बसला होता. लोकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

**दावा :** एका फलकावर लिहिले होते की, फुलतनपूर महाराजांनी हिमालयात ५० वर्षे तपस्या केल्यामुळे त्यांना दैवी शक्ती प्राप्त झाली आहे. आणि म्हणून ते शरीरावर सुईधाग्याने अशाप्रकारे फुले टोचून लटकवू शकतात. त्यांना वेदना होत नाही.

**रहस्यभेद :** वैज्ञानिकदृष्ट्या त्वचेचे दोन भाग आहेत. बाह्यत्वचा व आंतरत्वचा. त्यापैकी आंतरत्वचेत मज्जातंतू असल्याने त्यांस इजा झाल्यास आपल्याला संवेदना जाणवते. परंतु बाह्यत्वचेत जाड टणक व चपट्या पेशी असल्यामुळे त्यात सुई खुपसली तरी इजा होत नाही. अगदी क्षुल्लक स्वरुपाची वेदना-कळ जाणवते. अशाच रीतीने पुण्यातील शेखसल्ल्याच्या दर्ग्यातदेखील लोक मोहरमच्या दिवशी, उरुसाच्या दिवशी शरीरावर सुई-धाग्याने लिंबू टोचून घेतात. काही ठिकाणी लोक सुई अथवा दाभण गालातून खुपसून घेतात. मात्र सहन करण्याची सहनशक्ती व धीटपणा हवा. प्रत्येकवेळी शास्त्रीय कारण वेग-वेगळे असते.



◆◆◆




# कमाल दैवी शक्तीची धमाल एका अंड्याची

एकदा लताकाकूच्या पोरीला भूतबाधा झाली. मग शेजारच्या गावातील दर्ग्यावर मुसाबाबाकडे भूतबाधा उतरवली जाते असे लताकाकूंना कोणीतरी सांगितले. एके दिवशी लताकाकू व त्यांचे यजमान पोरीला घेऊन मुसाबाबाच्या दर्ग्यावर दुवा घेण्यासाठी गेले. शुक्रवार असल्याने दर्ग्यावर प्रचंड गर्दी. मुसाबाबाचा दरबार पहाटे पाच वाजता सुरू व्हायचा व रात्री उशिरापर्यंत चालायचा. लताकाकूंच्या पोरीचा नंबर ३७ वा होता. दुपारचे बारा वाजून गेले होते. दूरवरून आलेले लताकाकू व त्यांचे यजमान थकले-वैतागले होते. एकदाचा त्यांचा नंबर आला. एकावेळी बाबांच्या खोलीत फक्त दोघांनाच प्रवेश असायचा. लताकाकू पोरगी सीमाला घेऊन आत गेल्या.

गेल्या काही दिवसांपासून सीमा एकच गोष्ट वारंवार करायची. वारंवार हात धुणे, केस विंचरणे, चूळ भरणे, इत्यादी. घरच्यांना हे वेगळंच वाटत होते. आणि म्हणून उपचारासाठी तिला बाबांकडे आणले होते. बाबांने समोरच्या ताटातून एक अंडे घेतले व ते एका पाणी असलेल्या पातेल्यात टाकले. पण आश्चर्य हे की, ते अंडे पाण्यात बुडण्याऐवजी चक्क तरंगले. बाबा लताकाकूंकडे पाहून म्हणाले. 'मोठ्या भुताची बाधा आहे'. ''मग त्यासाठी काय करावं लागेल?'' लताकाकूने विचारले. भुताचा बंदोबस्त करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या विधीसाठी आवश्यक असणाऱ्या सामानाच्या यादीत १० प्रकारच्या उदांची नावे होती. ती नावे वाचून लताकाकू गांगरून गेल्या. कारण ते १० प्रकारचे उद जवळपास कुठे मिळणे अशक्यच होते. म्हणून ते बाबांनी आणावे अशी विनंती त्यांनी केली. बाबांनी त्यासाठी १०००/- रु.ची मागणी केली. लताकाकूंनी ते दिले व नंतर पुन्हा कधी यायचे ते ठरवून घरचा रस्ता धरला पण त्यांच्या डोक्यात एकच चक्र फिरत होते. अंडे पाण्यावर तरंगले कसे?

**दावा :** अंडे पाण्यावर तरंगते म्हणजे भूत खूपच ताकदवान आहे. त्याची बाधा दूर करण्यासाठी त्याला 'खाना' देणे आवश्यक आहे. हाच चमत्कार करून बाबा अनेकांची अनेक तऱ्हेची बाधा घालवतात.



**रहस्यभेद :** पातेल्यातल्या पाण्यात अगोदरच मीठ मिसळून ठेवले होते. त्यामुळे त्या (क्षार युक्त) पाण्याची घनता वाढलेली होती. अशा पाण्यात टाकलेल्या अंड्याच्या आकारमानाने बाजूला सारलेल्या पाण्याचे वजन हे अंड्याच्या वजनापेक्षा जास्त असते व त्यामुळेच अंडे पाण्यावर तरंगते.

◆◆◆



# करणी मुठीचा दावा मलंग बाबांचा बेरकी कावा

सरला 'अक्का' तशा खंबीर मनाच्या. अप्पा ज्या कापडाच्या गिरणीत कामाला होते ती गिरणी बंद पडली तेव्हा ते एकदम खचून गेले होते. निराश झाले होते, पण अक्कांनी धीर सोडला नाही. गिरणी आज ना उद्या चालू होईल या आशेवर त्या दिवस ढकलत होत्या. ताईचं लग्न झालं होतं. सुधीरला नोकरी लागली होती. धाकट्या रत्नाचं लग्न झालं की जबाबदारी संपली या आशावादावर अक्का येणारा दिवस ढकलत होत्या.

पण बाहेरचं वास्तव वेगळं होतं. गेल्या चार वर्षात पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं होतं. गिरणी मालकाला गिरणी चालवण्यात रस नव्हता. गिरणीची जमीन विकून त्या जागी टोले जंग इमारती बांधण्याचे डाव आता कामगारांना कळून चुकले होते. अप्पा गिरणी बंद झाल्यापासून येत्या ४ वर्षातच पंधरा वर्षांनी म्हातारे दिसू लागले होते. त्यामुळेच अक्कांचा धीर सुटू लागला. सुधीरला नोकरी लागेना. धाकट्या रत्नाला कॉलेज अर्धवट सोडून फॅक्टरीत पॅकींग डिपार्टमेंट मध्ये काम करावे लागतं याचं अक्कांना वाईट वाटायचं पण करणार काय?

अप्पा या सगळ्या जंजाळातून वाट काढण्यासाठी कुठल्या-कुठल्या बुवा-बाबांकडे जाऊ लागले. हल्ली ते नियमितपणे मलंग गडावरील मलंग बाबाकडे जाऊ लागले होते. त्यांच्या बरोबर अक्काही दोन चार वेळा मलंगबाबाकडे जाऊन आल्या. एका मागून एक संकटे येत होती. त्यात आता मलंगबाबांचा अप्पांना आधार वाटू लागला होता. आपल्यावर आणि आपल्या कुटुंबावर चुलतीने करणी केली आहे. असा अप्पांचा पक्का समज मलंगबाबांनी करून दिला होता.

बाबाने एकदा अक्कांना लिंबू आणि लाल दोरा आणायला सांगितला. त्याप्रमाणे अक्कांनी लाल दोरा आणि लिंबू बाबाला दिलं. बाबाने समाधी लावली. आपल्या कुटुंबावर कुणीतरी नातेवाईकाने करणी केली आहे. किंवा नाही ते तपासून पाहण्यासाठी एक प्रयोग केला. बाबाने एका हातात लिंबू घेऊन हातात सुरीने लिंबू अर्धवट कापले आणि त्यात लाल धागा ठेवून पुन्हा लिंबाच्या दोन्ही फोडी घट्ट चिमटीत धरून लाल दोरा दुसऱ्या बाजूने ओढला. बघता बघता लाल दोरा काळा झाला. झालं! बाबा जे म्हणत होते ते खरे ठरले. अप्पांचा व सरलाअक्कांची खात्री पक्की झाली.

या करणीतून 'मुक्त' होण्यासाठी बाब काय सांगतात याकडे अप्पा आणि अक्कांचे डोळे व कान लागले.

''करणी उलटवली पाहिजे'', महाराज म्हणाले, ''बाबा ते कसे शक्य आहे?'' त्यासाठी काय करावे लागेल? अप्पा उद्‌गारले. ''त्याच 'शास्त्र' मला माहीत आहे, परंतु 'शास्त्र' खूप खर्चिक आहे''. बाबा म्हणाले.

अक्का उठू लागल्या. बाबाने अक्कांना बसण्याची खूण केली ''हा 'काळा दोरा' तुम्हाला त्रास देईल. विधी तर करावाच लागेल''. बाबा दबक्या आवाजात म्हणाले राहून राहून शेवटी अप्पांनी 'खर्चाचे पाहून घेऊ' असे आश्वासन दिले. परंतु ही करणी उलटवलीच पाहिजे. असा होकार देताच बाबाने तांब्यातले पाणी ताम्हणात घेतलं आणि त्या पाण्यावर मंत्र टाकला. त्या मंतरलेल्या पाण्यात काळा झालेला दोरा टाकला. पुन्हा अक्कांना धक्का बसला. काळा दोरा पूर्ववत लाल झाला होता.

**दावा :** अशा रीतीने लाल धागा काळा होणे म्हणजे धोक्याची सूचना व पुन्हा काळा धागा पूर्ववत लाल होणे म्हणजे संकट निवारण्याची बाबांची हमी. थोडक्यात करणी झाली आहे व ती पुन्हा उलटवता येते. हाच दावा भगत, मांत्रिक करतात.

**रहस्यभेद :** लाल धाग्यात असलेल्या अल्कलीयुक्त रंग द्रव्याला जेव्हा लिंबातील रसामध्ये असलेल्या सायट्रीक ॲसिडला स्पर्श होतो तेव्हा रासायनिक क्रिया घडून लाल धागा काळा होतो. याचा भुतांशी करणीशी, मूठ मारण्याशी काहीही संबंध नाही. पुन्हा महाराज जेव्हा करणी उलटवण्याची क्रिया म्हणून पाण्यात धागा (काळा) बुडवतात तेव्हा ताम्हणातील पाणी हे निरमा पावडर युक्त पाणी असते त्यामुळे विरंजन क्रिया होऊन धागा पूर्ववत लाल होतो.

◆◆◆



# कौल नशिबाचा, की निर्वात होण्याचा?

बऱ्याच दिवसांनी संजूशेठच्या मनातील गोष्ट आज फळाला आली. महाराष्ट्रातील काही तीर्थक्षेत्री जाऊन यावे अशी त्यांची खूप दिवसांपासून इच्छा होती. संजूशेठनी एक ट्रॅक्स् भाड्याने केली. व आपल्या कुटुंबासह त्यांनी एके दिवशी महाराष्ट्र दर्शनास सुरूवात केली. सोबत मुलगी रेश्मा, मुलगा राकेश, धर्मपत्नी सुभद्रा, बहीण तारा व स्मिता आणि छोटा भाऊ आत्माराम यांच्या सहप्रवास सुरू केला.

पहाटे ५ वा. प्रवास सुरू करून सकाळी ८.३० वा. पर्यंत पनवेलहून स्वारीने एकवीरा देवीच्या मंदिराकडे कूच केली. 'कार्ला केव्हज' म्हणून प्रसिद्ध लेणी व देवीचे मंदिर पाहून सर्वजण खुश झाले. सुभद्रा ताईने देवीची ओटी भरली. सर्व जणांनी यथासांग पूजा केली. व देवीदर्शन आटोपून सर्वजण मंदिराबाहेर पडले. एके ठिकाणी काही तरुण मुले-मुली व काही वयोवृद्ध माणसे मंदिराच्या दगडी भिंतीवर नाणी चिकटवून आपल्या नशिबाचा खेळ खेळत होती. राकेश व रेश्मा घोळक्यात घुसून आपण वार्षिक परीक्षेत पास होणार का? नापास होणार? यांची परीक्षा म्हणून नाणी भिंतीवर चिकटवण्याचा प्रयत्न करू लागली थोड्याशा प्रयत्नाने रेश्माचं नाणं देवीच्या मंदिराच्या भिंतीला चिकटलं. रेश्मा खुदकन हसली व मनोमन सुखावली. परंतु अनेकवेळा प्रयत्न करूनही राकेशचे नाणं चिकटलं नाही. तो मनोमन नाराज झाला.

एकवीरा आईचे मंदिर पाहून झाल्यानंतर मंडळी पुण्याला आली. दुपारचे जेवण एका हॉटेलात घेऊन त्यानंतर सायंकाळी पुणे दर्शन केले. रात्री पुण्यात एका लॉजवर राहिले. सकाळी पुन्हा पुणे-सातारा मार्गे कोल्हापूरकडे अंबाभवानी मातेच्या दर्शनासाठी गाडीने मजल दरमजल करीत. काही छोटी मोठी देवस्थाने पहात मंडळी जात होती. सर्वत्र मंदिर, मसजिद, चर्च किंवा गुरूद्वार असो सगळ्या ठिकाणी दगडी भिंतीवर नाणी चिकटवून कौल मागण्याची प्रथा दृष्टीस पडत होती. कोल्हापूरलाही तेच घडलं. मंदिराच्या भिंतीवर काही व्यक्ती नाणी चिकटवत होती. रेश्मा व राकेश पुन्हा मंदिरात न जाताच तिथेच थबकली. आणि पुन्हा त्यांनी आपण वार्षिक परीक्षेत पास होऊ का? नापास होऊ? म्हणून कौल लावण्यासाठी भिंतीवर नाणं चिकटवण्याचा प्रयत्न केला. आता मात्र उलटं घडलं. राकेशचे नाणं त्वरित पहिल्या-दुसऱ्या प्रयत्नातच चिकटलं व

रेश्माने आता अनेक वेळा प्रयत्न करूनही नाणं काही चिकटलं नाही. तिने बऱ्याच आणाभाका घेतल्या. देवीला नवस बोलली परंतु काहीही फायदा झाला नाही. आता रेश्मा मात्र मनातून फारच हादरली. कारण ज्या एकवीरा आईने रेश्माला पास होण्याचे सर्टिफिकेट 'पॉझिटिव्ह कॉल' देऊन दिले होते. तेच आज कोल्हापूरच्या अंबाभवानीने खोटं ठरवलं होतं. व जेथे एकवीरा आईने राकेशला 'निगेटिव्ह कॉल' देवून नाराज केलं होते तेथे आज कोल्हापूरच्या अंबाभवानीने राकेशला 'पॉझिटिव्ह कॉल' देऊन प्रसन्न व आनंदी केले होते.

'ही काय भानगड आहे?' म्हणून मुलांनी रात्री संजूशेठला (वडिलांना) विचारलं संजूशेठ हसले आणि म्हणाले, ''अशी नाणी मंदिर/मसजिद/चर्च किंवा गुरूद्वार यांच्या भिंतीवर चिकटली काय आणि नाही चिकटली काय. त्यामुळे कुठलीही हानी किंवा कोणताही लाभ होत नाही. आपण प्रयत्न करावे व बुद्धीच्या आधारे जगावे. नाणी चिकटणे ही एक शास्त्रीय प्रक्रिया आहे.''

**दावा :** लोक आपल्याला यश येईल का अपयश येईल याची तपासणी करीत असतात. थोडक्यात 'नशिबाच्या आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळतात. अशा रीतीने धार्मिक देवस्थानांच्या दगडी भिंतीवर नाणी चिकटवून 'कौल' मागतात. त्यांना मनोमन वाटते की नाणं चिकटलं तर आपली मनोकामना पूर्ण होणार. नाही चिकटलं तर पूर्ण होणार नाही. कधी कधी अनेक प्रयत्नांनी देखील नाणे चिकटत नाही तेव्हा लोक समजतात की काही तरी अडचण आहे. मग आणाभाका घेऊन देवाशी सौदा करतात. त्याला 'लाच' देवून भ्रष्टाचारी बनवण्याचा मार्ग अवलंबतात व त्याला नवस बोलतात व पुन्हा प्रयत्न करतात कधी कधी ते चिकटतं, तर कधी नाही.

**रहस्यभेद :** अनेकवेळा देवस्थानांच्या दगडी भिंतीवर नाणी चिकटवून कौल मागताना कधी एखाद-दुसऱ्या प्रयत्नांनी नाणं चिकटतं तर कधी कधी अनेक वेळा प्रयत्न करूनही नाणं चिकटत नाही. वास्तविक पहाता ज्या क्षणी दगडी भिंतीचा पृष्ठभाग व नाणं यांच्या मधील जागा 'निर्वात' होईल त्याक्षणी नाणं दगडी भिंतीवर चिकटतं. मग 'निर्वात' होण्याची क्रिया कधी पहिल्या/दुसऱ्या प्रयत्नात होईल किंवा कधी कधी तासभर प्रयत्न करूनही होणार नाही. त्यात तुमच्या मनोकामना व इच्छा आकाक्षांचा प्रश्न येतोच कुठे?

परंतु बुद्धीची कवाडं बंद करून माणसं अंधश्रद्धेची झापडं बांधून देवदर्शनाला निघाली की या पेक्षा वेगळं ते काय होईल?



नाणं अनेक प्रकारे चिटकवून कौल मागण्याच्या पद्धती अनेक ठिकाणी दृष्टीस पडतात. कुठे कोयत्यावर नाणं चिटकवलं जात तर कुठे आरशावर पाणी शिंपडून नाणं चिकटवतात. तसेच कुठे कुठे देवीच्या/देवाच्या मूर्तीवर एखादे फूल ठेवून डावा का उजवा कौल मागण्याचीसुद्धा प्रथा आहे.

◆◆◆

# आली आली सिंहस्थ पर्वणी, ऐका नागा साधूंची कहाणी

दर बारा वर्षांनी भारतात काही प्रसिद्ध तीर्थक्षेत्री सिंहस्थ पर्वणी निमित्त कुंभमेळा भरतो. नाशिक, हरिद्वार, ऋषीकेश या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साधू संत व भक्तगण भाविक जमा होतात. नुकताच नाशिक येथील कुंभमेळ्यात दृष्टीस पडलेला एक तथाकथित चमत्कार नागा साधूंनी केला होता. एके ठिकाणी प्रचंड मोठा भव्य मंडप उभारला होता. काही नागा साधू एके ठिकाणी शेकोटी पेटवून त्या सभोवताली गांजा ओढत बसले होते. या मंडपाचे नाव होते 'नागा साधू आखाडा'.

याच आखाड्यात मध्यभागी भव्य व्यासपीठ उभारले होते. त्यावर आठ नागा साधू ध्यानस्थ बसले होते. साधूंनी आपल्या शरीरावर सर्वत्र लिंबे धाग्याने लटकवलेली होती. जवळच एक फलक लावलेला होता. त्यावर 'नागामहाराज समाधी योग सोहळा' असे लिहिलेले होते. व खाली समाधीत भाग घेणाऱ्या महाराजांची यादी व त्यांनी हिमालयात किती वर्षे तपस्या केलेली होती त्याची आकडेवारी ही लिहिलेली होती. हे सर्व पाहण्यासाठी प्रचंड गर्दी आखाड्यात जमा झाली होती. लोक फलक वाचून व महाराजांच्या समाधीचे सामर्थ्य किती असू शकते? याचा प्रत्यक्ष 'आँखो देखा हाल' पाहून आश्चर्यचकित होते. हे पाहून महाराजांच्या जवळ जाऊन पदस्पर्श करून नमस्कार व लोटांगण घालत होते.

वास्तविक पहाता हा चमत्कार उत्तर भारतातील कित्येक मंदिरात पाहावयास मिळतो. लहान लहान मुलांच्या शरीरावर सफरचंद, लिंबासारखी फळे लटकवलेली दृष्टीस पडतात. शेख सल्ल्याच्या दर्ग्याच्या ठिकाणी कित्येक हिंदू-मुस्लीम दरवर्षी उरूसाच्या दिवशी येऊन आपला अभिनव नवस गालातून आरपार दाभणासारखी (लांब सुई) खुपसून करतात. यात अडीच दिवसाच्या मूलांपासून ते ६०/८० वर्षांच्या पुरुषांपर्यंत सर्वजण सळई खुपसण्याच्या कार्यक्रमात भाग घेतात. मोहरमच्या दिवशी ताबूताच्या यात्रेत (मिरवणुकीत) तर स्वत:ला शिक्षा करण्यासाठी कित्येक (मुस्लीम बांधव स्वत: शरीरावर तीक्ष्ण हत्याराने जखमा करतात. महाराष्ट्रातील कित्येक यात्रांमध्ये पाठीवर हूक अडकवून बैलगाड्या ओढण्याचा, पाठीवर व मानेवर हूक अडकवून 'बगाडाची मिरवणूक' गावभर यात्रेनिमित्त फिरवण्याचा प्रघात आहे.





या अशा प्रथा व रुढींमधून दिसून येणारे हे क्रौर्य, चमत्कार, दैवी शक्ती, योगिक शक्ती अशा नावाने प्रसिद्ध आहे. लोकांना हा चमत्कार वाटतो. म्हणून तर कुंभमेळ्याच्या ठिकाणी अंगावर साध्या सुईने शरीरावर लिंबूने टोचून घेतलेले साधू सामान्य माणसांना दैवी पुरुष वाटतात. ह्या सगळ्या प्रकारामध्ये साधे शरीरशास्त्रीय सत्य लपलेले असते.

**प्रयोग :** आपल्या शरीराची वरची चामडी (त्वचा) (एपेडरमिस) चिमटीत धरून दोन तीन वेळा ओढा. ८ नं. ची पातळ, छोटी कपडे शिवायची सुई घेऊन एका धाग्याने एक लिंबू ओवून नंतर ती सुई उकळत्या पाण्यात निर्जंतुक करून वरच्या त्वचेतून सुई आरपार करा व लिंबू लटकवत ठेवा. धाग्याला गाठ बांधू नका. कारण पुन्हा धागा व लिंबू सोडवून घेणे त्रासदायक होईल.

**रहस्य :** या प्रकारे सुरुवातीला हाताच्या मनगटाला एक/दोन लिंबे सहज लटकवता येतात. सरावाने शरीरावर जास्त लिंबे लटकवता येवू शकतात. आपली त्वचा बरेच वजन तोलून धरू शकते. शरीराच्या बाह्यत्वचेत चेतापेशी नसतात. त्यामुळे जास्त तीव्र वेदना होत नाहीत. शिवाय रक्तपेशीही नसल्यामुळे रक्तस्राव होत नाही.

**सूचना :**

१) सुई निर्जुंतूक करूनच वापरावी.

२) शरीरात सुई टोचत असतांना सौम्य वेदना होतातच तरी त्या सहन करण्याची तयारी ठेवावी.

३) कधी कधी सुई टोचणाऱ्या माणासांच्या हातून बाह्यत्वचेऐवजी चुकून आंतरत्वचेतून सुई खुपसली जाते. त्यावेळी थोडेफार रक्त बाहेर पडण्याची शक्यता असते.

४) ह्या प्रयोगातून सहाय्यक म्हणून आपलीच व्यक्ती असावी तिच्यात हस्ते सुई टोचून घ्यावी. जनसमुदायातून कुणालाही सुई टोचण्यासाठी बोलावू नये. अनुभव नसल्यामुळे सुईने इजा होण्याचा संभव असतो.

५) सुरूवातीला आपल्या मनगटावर, बाहूवर व सरावाने पूढे शरीरावर पोट, पाठ, गाल, कपाळ अशा ठिकाणी लिंबू टोचून लटकवणे शक्य होते.

६) कधी कधी जेथे सुई टोचली असेल तेथे सूज येऊ शकते. थोड्या कालावधीनंतर सूज सहजपणे ओसरते. औषधोपचार करण्याची गरज नाही.

७) प्रयोगसाठी सुई टोचण्याचा व आपल्या शरीरावर लिंबू लटकवण्याचा पुरेसा सराव प्रथम करावा.

८) सुई नेहमी एकाच ठिकाणी टोचू नये.

९) सुई रक्तवाहिन्यांपासून दूर टोचण्याचा सराव असावा.

१०) सुई टोचलेल्या जागी व्रण राहू शकतात. पुढे ते पूर्णपणे बरे होतात.

११) नव्याने प्रयोग करणाऱ्यांनी सुई टोचण्याच्या जागी स्पिरीट चोळावे.

१२) सोबत नेहमी टिंचर आयोडिनची बाटली ठेवावी. रक्तस्राव जास्त झाल्यास जखमेवर चोळावे.

◆◆◆



# दुग्ध प्राशन गणरायांच !


दिनांक २१ सप्टेंबर १९९५ रोजी नेहमी सारखीच सकाळ. परंतु अचानक एक आक्रीत घडलं. चक्क गणरायांनी म्हणे दूध पिण्यास सुरूवात केली. एकच हाहा:कार माजला. जिकडे तिकडे गणरायाच्याच नव्हे तर इतर देवादिकांच्या मंदिरासमोर हातात वाटीभर दूध व चमचा घेऊन भक्तांनी रांगा लावल्या. भर दुपारीदेखील शहरी भागात रस्ते गजबजून गेले होते. प्रत्येकजण गणराया माझ्या हातातून दूध कसा प्याला ते अगदी भावुकतेने सांगत होता. प्रत्येकाला वाटत होतं की खरोखरच गणराया दूध पिऊ लागला आहे. परंतु त्यातं ही काही सुज्ञ, बुद्धीची कवाडं सदैव उघडी ठेवून नेहमीचं वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणारी माणसं हा सारा गोंधळ उघड्या डोळ्यांनी पहात होती. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी मात्र गावोगावी ही वस्तुस्थिती सत्य काय असत्य काय? हे सप्रयोग दाखविले त्याच दिवशी अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी मोठ्या धैर्याने परिस्थितीशी सामना केला व त्यातील वैज्ञानिक सत्य लोकांपुढे आणले.

**सत्यता :** गणरायाची नव्हे तर कुठलीच मूर्ती. धातूची, दगडाची मातीची, शाडूची, लाकडाची वगैरे) कधी दूधच नव्हे तर कोणताच द्रव अथवा घनपदार्थ पिणार अगर खाणार नाही. तरी सुद्धा लोक त्या दिवशी छातीठोक पणे 'गणपती दूध पितो' असे कसे म्हणत होते?

जणू काय त्या दिवशी महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण भारतभर आणि त्याही पलिकडे जगभरातील काही राष्ट्रात गणराया दूध पीत होता;अशा बातम्या होत्या. एका उत्तर भारतीय माणसाला विचारले तर त्यांनी सांगितले की '' शिवजी की पुरी फॅमिली दूध पी रही है।''



डोंबिवलीत एका अशिक्षित स्त्रीने तर मारुतीरायाच्या शेपटीलाच दुधाचा चमचा लावला होता. आम्ही जेव्हा चौकशी केली तेव्हा तिने म्हटलं की,'' जर तुमचा गणराया सोंडेने दूध पितो' तर माझा मारुतीराया शेपटीने दूध का पिणार नाही. सोंड हे गणरायाचे तोंड नाही ते' नाक आहे, नाकानं दूध तो पिणारच कसा?'' यावरून असे दिसते की एका



अशिक्षित अर्धशिक्षित अडाणी बाईला वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाण होती. परंतु सर्व शिक्षित, उच्चशिक्षित मात्र त्या दिवशी डोळ्यांना झापडं बांधून, बुद्धीची कवाडं बंद करून आपली अक्कल गहाण टाकून गणरायाला दूध पाजायला रांगेत उभी होती.

सर्वसाधारणं गणरायाच्या दूध प्राशनामध्ये दोन तत्त्वांचा समावेश आहे. केशाकर्षण व पृष्ठीय तणाव

**प्रयोग :** एका चमच्यात दूध वा पाणी घ्यावे. चमचा आकृतीत दाखविल्याप्रमाणे दोन बोटांच्या चिमटीत धरावा. अंगठा द्रवात (स्पर्श करावा.) व एक बोट (अंगठ्याच्या लगतचं) खाली सरळ ३०° कोनात ठेवावं दुधाच्या (पाण्याच्या) पृष्ठ भागांना अंगठ्याचा स्पर्श होताच पृष्ठीय ताणामुळे दूध वर चढून लगतच्या खाली असलेल्या बोटावरून घरंगळून खाली पडण्यास सुरूवात होईल.

या प्रयोगाद्वारे आपण हेच सिद्ध करतो की, त्या दिवशी २१ सप्टेंबर ९५ रोजी दुधाचा चमचा सोंडेला लावल्या नंतर दूध पूर्णपणे खाली जात होते व त्याकडे माणसांनी दुर्लक्ष्य केल्यामुळेच गणराया प्रत्यक्ष दूध पितो आहे असे लोकांना वाटत होते.

काही मूर्ती ह्या मातीच्या मातीच्या किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिस,शाडूच्या असल्यामुळे शोषणाच्या गुधधर्मानुसार थोडेफार दूध त्या मूर्तींनी शोषून घेतल्यामुळे लोकांना भास झाला. तसेच काही धातूच्या मूर्तींची सोंडही पोकळ असल्यामुळे केशाकर्षण पद्धतीने दूध थोडेफार सोंडेने शोषून घेतल्यामुळेदेखील गणराया दूध पितो असा भास निर्माण झाला होता. वास्तविक हे सर्व खोटे होते. कारण प्रत्येक मंदिराच्या ठिकाणी मंदिराच्या मूर्तीच्या खाली भरपूर दूध जमा झाले होते. तर काही ठिकाणी हे सर्व दूध मागच्या बाजूने गटारातून वाहत जात होते. अशी वस्तूस्थिती होती.

◆◆◆



# ‘आम्हा अंगे दैवी शक्ती, ही तर पाणाड्यांची क्लृप्ती’

शिदबा हा ठाणे जिल्ह्यातील आसनगांव, ता. शहापूर मधील एक वयोवृद्ध ‘पाणाड्या’

‘पाणाड्या’ म्हणजे भूगर्भातील पाणी अचूक शोधणारी एक ‘वल्ली’ लोक म्हणतात शिदबाचा जन्म ‘पायाळू’ झाला आहे. त्यामुळे शिदबावर आकाशातील वीज देखील पडू शकत नाही आणि म्हणूनच तो जमिनीतील पाणीदेखील दैवी शक्तीने दाखवू शकतो.

शिदबा ह्या भागात गेले २०/२५ वर्षे भूगर्भातील पाणी शोधून काढण्याचं काम करतो. त्या भागात पूर्वीपासून लोक बागायती पिके करतात. पूर्वी लोक खूप खोल विहिरी खोदत. परंतु कधी कधी पाणी लागत नसे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अंगावर कर्ज होई. त्यांची मेहनत व पैसा वाया जाई. परंतु आता शिदबाच्या ह्या किमयेपायी शेतकरी खुषीत आहेत. कारण पाणी शोधण्याचा ‘रामबाण उपाय’ त्यांना सापडला आहे. लोक असेही म्हणतात की, आम्हा गरीब लोकांच्या सेवेसाठीच परमेश्वरांनी शिदबाची नेमणूक ह्या भागात केली आहे. कारण जेव्हा जेव्हा विहिर खोदायची असेल घरातील वस्तू हरवली असेल, घरातील व्यक्ती, जनावरं (गुरंढोर, मेंढरू,कोकरू वगैरे) हरवलं असेल तर एवढ्या मोठ्या २०-२५ हजार लोकवस्तीच्या परगण्यातून लोक शिदबांचा सल्ला घेतात. शंभरात १५ ते २० वेळा शिदबाचा अंदाज चुकत असेल, परतुं त्याचा नाईलाज आहे. कारण शिदबाने जागा दाखविल्यानंतर त्या घरात १५ दिवसांत समजा एखादी स्त्रीची



मासिक पाळी सुरु झाली तर जमिनीतील पाण्याचा साठा सुनियोजित जागेवरून पुढे सरकतो असे शिदबाने बजावून सांगितलेले असते. तसेच कधी कधी त्याजागेच्या परिसरातून १५/२० फुटावरून जशी एखादी 'मासिक पाळी' सुरू झालेली स्त्री गेली तरी पाणी विहिरीला लागणार नाही. मग पुन्हा नव्याने जागा शोधूनच विहीर खोदणे आवश्यक आहे. परंतु कधी कधी घरी एखाद्या स्त्रीची मासिक पाळी सुरू झालेली असतानादेखील ती स्त्री हे जाहीर करीत नाही कारण तिला माहीत असते की असे



आपण म्हटलं तर मग पुन्हा शिदबाला बोलावून पैसे देऊन दुसरी जागा निश्चित करावी लागेल. शिवाय आपण सांगितले तर उगीचच ४००/५०० रुपयांचा खड्डा (घाटा) आला म्हणून घरातील लोक आपल्यालाच दूषणे देतील. त्यापेक्षा ती गप्प रहाणे पसंत करते. अशावेळी बिचारा शेतकरी खोदकाम सुरू करतो. व तेथे पाणी लागत नाही. मग लोक शिदबाला दोष देतात. यावर देखील शिदबाकडे गेल्यावर तो 'अंजनाच्या डबीत' पाहून घरात काय बाधा आली? व त्यामुळे पाणी कसे लागले नाही? ते स्पष्ट करतो.

यामुळे लोक असे म्हणतात की शिदबाचा अंदाज कधीच चुकत नाही. जे काही अपयश येते ते वरील कारणांमुळेच.

शिदबा पाण्याची दिशा कशी निश्चित करतो? किंवा घरातून एखादी व्यक्ती घर सोडून गेली असेल किंवा हवेली असेल किंवा म्हैस, रेडा, बैल, मेंढरू, कोकरू हरवलं असेल तर कशी दिशा निश्चित करतो?

शिदबा एक तवा घेतो. ज्या ठिकाणी पाणी शोधायचं आहे. तेथे शेतात थोडी जागा साफ करतो जमिनीवर तवा ठेवतो. त्यात वाळू भरतो व त्या वाळूवर एक हंडा (मडकं) ठेवतो व त्या वर स्वत: बसतो आणि पाणी असेल तेथे हंडा फिरतो. जिकडे शिदबाचे तोंड जाईल त्या दिशेला शिदबा १० पावल चालत जातो. तिथेच काठीने रिंगण आखून मध्यभागी टोकदार सळई नाहीतर





काठी जमिनीत टोचून उभी करतो. येथेच शुभ दिनी खोदा म्हणून सांगतो. एवढं झाल्यानंतर तो दिवस (शुभ दिन) पंचांगात बघून सांगतो. शिवाय त्या दिवसापर्यंत घरात कुणाचीही मासिक पाळी सुरू होता कामा नये शिवाय ह्या ठिकाणाच्या आजूबाजूने १५ फुटांपर्यंत अशा व्यक्तीचा प्रवेशदेखील होता कामा नये असे बजावतो.

**शास्त्रीय कारण :** शिदबा जेव्हा पाय उचलून हंड्यावर बसतो तेव्हा तोल सावरतांना अचानक मडकं हे फिरणारच. शिदबा फक्त त्याला हव्या त्या दिशेला जोर लावून फिरवतो इतकंच. शिदबा सर्वसाधारण जमिनीचे निरीक्षण करून एक जागा प्रथमच मनात ठरवितो. ती जागा साधारणपणे हिरवळ असलेली दाट/हिरवीगार झाडं असलेली आणि साधारणत: इतर जमिनीपेक्षा उतार असलेली अशी जागा असते. सर्वसाधारण अशा जागी पाणी मिळण्याची शक्यता जास्त असते. त्यातल्या त्यात जर अंदाज चुकलाच तर स्वत:कडे दोष येऊ नये म्हणून 'स्त्रीच्या मासिक पाळीचा' आधार त्यांनी घेतला आहेच. बुवाबाजीमध्ये अशा तऱ्हेने अनेक आडकाठ्या तयार केल्या जातात व दोष नेहमी समोरच्या व्यक्तीवर लोटला जातो.

घरातील बाकी गुरं-ढोरं किंवा हरवलेली वस्तू शोधण्यासाठी शिदबा पुढीलप्रमाणे प्रयोग करतो.

१) एक गोल कळशी घेतो, जमिनीवर ज्वारी पसरवितो व त्यावर कळशी ठेवतो. त्यावर बसतो व दिशा निश्चित करतो.

२) दुसऱ्या एका प्रयोगात तो पाट घेतो. पाटावर सर्व बाजूंनी गुळगुळीत केलेला नारळ ठेवतो व त्या नारळावर दोन्ही पाय ठेवून बसतो तो नारळ गरकन फिरतो व दिशा निश्चित करतो. ह्या सर्व प्रयोगात बदमाषी उघड दिसते.

◆◆◆

## बाबा बंगाली, पक्का असे मवाली!

चंपाताई गेले दोन तीन महिने सतत चिंताग्रस्त होऊन बसलेल्या. त्यांना झोप लागत नव्हती. कधी डोळा लागला तर अचानक दचकून उठतात. जेवण अजिबात जात नव्हते. सतत पोट फुगलेले असायचे. अन्नावर इच्छा होत नसायची. या जीवनाचा शेवट करावा, उगीचच कशासाठी जगायचं? असां विचार त्याच्या मनात येई. संसारात लक्ष लागत नव्हते. विरक्ती आल्यासारखे वाटत होते. कधी कधी आत्महत्या करावी असेही वाटत होते.

बरेच डॉक्टरी इलाज झाले परंतु यश येत नव्हतं. भगत-मांत्रिक तर रोजचेच चालू होते. कुणीतरी सांगितलं की ठाण्याला एका लॉजवर बाबा बंगाली उतरले आहेत. फक्त आठवडाभर त्यांचा मुक्काम होता जाऊन त्यांची भेट तर घ्यावी म्हणून त्या तेथे गेल्या.

बाबा बंगाली यांच्याकडे सकाळी सकाळी ५०-६० गिऱ्हाईकं ठिय्या मांडून बसली होती. प्रत्येकाला ५-६ मिनिटातच उपचार करून हवी तशी दक्षिणा घेऊन बाबा बंगाली अक्सर इलाज सांगत होता. चंपाताईंचा क्रमांक लागता लागता दुपारचे दोन वाजले. बाबा बंगालीनी तक्रार शांतपणे ऐकून घेतली.

बाबाने चंपाताईना सांगितलं की, त्यांना 'जीनची' बाधा झाली आहे. हे जीन जाळायला हवेत. मी माझ्या मंत्रशक्तीने जाळतो असेही तो म्हणाला. 'जीन' म्हणजे भूत. जीन हा शब्द उर्दू भाषेतून आलेला आहे. मग चंपाताईंना त्यांनी थर्माकोलच्या ७ गोळ्या (छोट्या बॉल बेअरींगच्या आकाराच्या) दिल्या. त्या सात जीनची त्यांना बीमारी आहे म्हणून सांगितले.


नंतर सातही गोळ्या स्वत:च्या मुठीत बंद केल्या आणि मंत्रोच्चार सुरू केला. दोन्ही हाताचे पंजे एकत्र घासले गेले आणि क्षणार्धात ती सातही भूत हातातून हवेत उडून गेली; अदृश्य झाली. चंपाताईंना हा चमत्कार वाटला. कारण त्या थर्माकोलच्या गोळ्या एकाएकी कुठे गायब झाल्या ते त्यांना समजले नाही. बाबा बंगालीने त्या मंत्राने हवेत धूर न काढता जाळल्या होत्या असा दावा होता. आता चंपाताईची बीमारी कायमची दूर होईल. कारण त्यांच्या डोक्यातील मनातील 'जीनची' बीमारी बाबांनी जाळून टाकली होती.



**वास्तवता :** बंगाली बाबांनी हातात थर्माकोलच्या गोळ्या जेव्हा घेतल्या त्याच वेळी हाताला 'बुमोफिक्स' किंवा केमीप्लेक्स' हा चिकटपदार्थ लावला होता. त्यावर जोराने थर्मोकोलच्या गोळ्या रगडल्यामुळे थर्माकोल व बुमोफिक्स ह्या रासायनिक पदार्थाची रासायनिक अभिक्रिया झाली व त्यात थर्माकोल विरून नाहीसे झाले. बुमोफिक्स हवेत उडून निघून गेले. थर्मोकोलचे काही बारीक कण जे चंपाताईंना दृष्टीसदेखील पडले नाहीत.

चंपाताई पूर्णपणे फसल्या गेल्या त्यांनी बाबा बंगालीची ३०० रुपये फी दिली व त्या निघून गेल्या. त्यांचा आजार पुढे बळावत गेला. कारण त्यांना 'नैराश्य' हा मानसिक आजार जडला होता. त्यामुळेच त्यांना डोकेदुखी अर्धशिशी, ॲसिडिटी (आम्लवाढ) निद्रानाश वगैरे लक्षणे दिसत होती. ही लक्षणे नैराश्य- चिंता या रोगात दिसून येतात.

आजकाल मुंबई-पुणे या सारख्या मोठ्या शहरांत लोकल गाडीत, बसमध्ये, संडास किंवा सार्वजनिक मुताऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात छोटी पोस्टर्स, स्टीकर्स चिटकवून बाबा बंगाली सारखी मंडळी, कित्येक फकीर वैदू यांनी अशा तऱ्हेने गुप्त रोगांवरील इलाज, एडस्, कॅन्सर, जुनाट दमा, फेफरे, कोड, मिरगी यासारख्या रोगांपासून ते सांगता येत नाही सहन होत नाही ह्या प्रकारात मोडणाऱ्या लैंगिक रोगांवर इलाज केला जाईल म्हणून जाहिरात करून लोकाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन लावले जाते. तसेच मनाच्या आजारांवर करणी, मूठ मारणे, भानामती जादू टोणा. भुताटकी अशा सर्व तऱ्हेच्या समस्यांवर तसेच कोर्ट कचेरीतील कज्जे-तंटे सहीसलामत सुटण्यासाठी आणि



शेअर्स बाजारात यश मिळण्यासाठी अक्सर इलाज सांगितला जातो. अंधश्रद्धाळू असहाय व असाध्य आजाराने हैराण झालेले लोक अशा खोट्या फसव्या जाहिरातींना बळी पडतात व लुटले जातात. मुंबईत भाईंदर येथे पाऱ्यापासून शिवलिंग करून दिले जाईल व तुमचे आजार त्याद्वारे बरे होतील अशी जाहिरात करून फसवले जात आहे.

कुठे कुठे रेकी, चुंबक चिकित्सा वगैरे प्रकारदेखील दृष्टीस पडतात. वरील कित्येक आजारांवर आजही हमखास इलाज माहित नसल्यामुळेच लोकांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन हे भोंदू कुठे तरी एखाद्या लॉजवर हॉटेलवर आठवडा पंधरा दिवस मुक्काम ठोकून लोकांची लूट करतात. लगेच तेथून मुक्काम हलवितात. दुसऱ्या शहरात जातात. तेथील स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देतात. पुन्हा लोकांची रांग लागते लूटमारीचा हा व्यवसाय चालूच राहतो. बुवाबाजी हा बिनभांडवली व्यवसाय आहे. त्यात चमत्काराची जोड देऊन तो वाढविणं सोप जातं म्हणून चमत्कार करणं गरजेचं होऊन बसतं. लोक याला बळी पडतात.

◆◆◆



## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची

# प्र का श ने

आपल्या मनातील अनेकविध प्रश्नांना अचूक उत्तरे देणारी वाचनीय, उद्‌बोधक, मनोरंजक आणि स्वस्त पुस्तके अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रकाशित केली आहेत. अंधश्रद्धेच्या अंध:कारात ज्ञानाचा प्रकाश दाखवणारी, मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या विज्ञानाशी हसत-खेळत नातं जोडणारी, संवेदनाशील मनांना विचारांनी सकस करणारी ही पुस्तकेनिव्वळ वाचनीयच नव्हे तर जगणं अर्थपूर्ण करणारी आहेत. चला तर ! खुल्या विचारांना सामोरे जाऊ, पुस्तकांच्या वैशिष्ट्यांवर नजर टाकू !

**१. मनोविकार आणि भूतबाधा** (किंमत रु.६/-)
मन, मनाचे आजार, त्याबद्दलच्या अंधश्रद्धा यांची माहिती देणारी प्रश्नोत्तरे.

**२.सर्पविज्ञान** (किंमत रु.६/-)
सर्पाबद्दलचे गैरसमज आणि अनाठायी भीती दूर करणारी वेधक माहिती.

**३. व्यसनमुक्ती** (किंमत रु.६/-)
व्यसनाधीनता, त्याची कारणे, परिणाम आणि उपाययोजना सांगणारी उपयुक्त पुस्तिका.

**४. वैज्ञानिक दृष्टीकोन** (किंमत रु.६/-)
सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांना आवश्यक असणाऱ्या जीवनशैलीची नेमकी व सोपी ओळख.

**५. वयात येताना** (किंमत रु.६/-)
वयात येताना होणारे शारिरिक, मानसिक, भावनिक बदलांबद्दलची माहिती व मार्गदर्शन.

**६. गैरसमजांच्या प्रदेशात** - ले. कुमार मंडपे (किंमत रु.१५/-)
पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी अंधश्रद्धेच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे सचित्र पुस्तक.

**७. आपण सारे बदलू या !** - ले. विद्याधर बोरकर (किंमत रु.३०/-)
आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गोष्टीरूपात लिहिलेले अंधश्रद्धा निर्मूलनाचे सचित्र पुस्तक.

**८. अंधश्रद्धांची दुनिया चमत्कारांची किमया** भाग -१
- ले. प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे, कुमार मंडपे, पां. न. निपाणीकर (किंमत रु.४०/-)
बुवाबाजीतील चमत्कारांचा पर्दाफाश करणारे आणि गौडबंगाल उलगडूनदाखवणारे पुस्तक.

**९. भ्रामक वास्तुशास्त्र** - ले. डॉ. प्रदीप पाटील (किंमत रु.१००/-)
दैवी वास्तुशास्त्राच्या भ्रामकतेवर प्रकाश टाकणारे अभ्यासपूर्ण पुस्तक.

**१०. समाजसुधारक आणि अंधश्रद्धा** - संपादक : स. मा. गर्गे
संत आणि समाजसुधारकांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्यावर विचारवंतांचे लेख.(किंमत रु.५०/-)

**११. आरोग्य आणि अंधश्रद्धा** (किंमत रु.१५/-)
- ले. डॉ.संजयकुमार लड्ढा, डॉ. मनिषा लड्ढा.
आरोग्यविषयक गैरसमज आणि अंधश्रद्धांबाबत महत्वपूर्ण माहिती.

**१२. भूतबाधा, मनोविकार आणि अंधश्रद्धा**
- ले. डॉ. प्रदीप पाटकर. (किंमत रु.१५/-)
भूतबाधा, अंगात येणे, करणी, भानामती यामागील मनोव्यापारांचा वेधक मागोवा.

**१३. संमोहन** - ले. ओंकार पाटील (किंमत रु.१२/-)
संमोहन किती खरे? किती खोटे? याचे शास्त्रीय विश्लेषण.

**१४. आत्मा, पुनर्जन्म, प्लँचेट; वैज्ञानिक दृष्टीकोन**
- ले. प्रा. प. रा. आर्डे
आत्मा, पुनर्जन्म, प्लँचेट यांची शास्त्रीय उकल; वैज्ञानिक दृष्टीकोनाची सोपी ओळख.

**अंनिस – स्वरुप आणि कार्य**- ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याचा परिचय(किंमत रु.१८/-)

**१५. प्राचीन ज्योतिषाचे तीन तेरा**
- ले.प्रा. प. रा. आर्डे, प्रकाश घाटपांडे, ओंकार पाटील.
नॉस्ट्राडॅमस, भृगूसंहिता आणि फसवे नाडीज्योतिष या परदेशी व भारतीय प्राचीन भविष्यकथनपद्धतींवर खास प्रकाशझोत (किंमत रु.३०/-)

**१६. बुवाबाजी** - ले. डॉ. प्रदीप पाटील (किंमत रु.१२/-)
बुवाबाजीचा सामाजिक अंगाने घेतलेला वेध.

**१७. धर्म की धर्मापलीकडे?** - ले. आ. ह. साळुंखे (किंमत रु.६०/-)
धर्माचे महत्व, सामर्थ्य, मर्यादा, पर्याय, हिंदू-मुस्लीम संबंध यावर चिंतनीय विचार

**१८. अशा रोखल्या यात्रेतील पशुहत्या**
- ले. रामकुमार रायवाडीकर (किंमत रु.३०/-)
अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने पशुहत्या थांबवलेल्या १५० यात्रांमधील निवडक संघर्षाचे वर्णन.

◆◆◆



# इतर प्रकाशने

**१.भ्रम आणि निरास** - ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर (किंमत रु.३०/-)
अंधश्रद्धांचा विविध अंगांनी घेतलेला वेध.

**२.अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
- ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर (किंमत रु.३०/-)
अंधश्रद्धांविषयी सतत पडणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे.

**३.अंधश्रद्धा विनाशाय**
- ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर (किंमत रु.६०/-)
अंधश्रद्धांविरोधात केलेल्या विविधांगी संघर्षाचे रोमहर्षक अनुभवकथन.

**४.विचार तर कराल !** - ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर (किंमत रु.७०/-)
वैज्ञानिक दृष्टीकोन आणि विवेकवाद यांची सम्यक मांडणी. जीवनातील अनेक घटनांवर वेगळा दृष्टीक्षेप.

**५.श्रद्धा-अंधश्रद्धा** - ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर (किंमत रु.५०/-)
श्रद्धा-अंधश्रद्धा, स्त्री आणि अंधश्रद्धा, फलज्योतिषाचे थोतांड, अंगात येणे, भूतबाधा,झपाटणे, नीती, धर्म अशा विषयांवर विवेचन.

**६.लढे अंधश्रद्धेचे** - ले. डॉ. नरेंद्र दाभोलकर (किंमत रु.२००/-)
अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील विविधांगी संघर्षाचे जिवंत चित्रण.

सर्व पुस्तके सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत.
ती मागविण्याचा पत्ता :
**मारुतराव पांगे**
सहकार्यवाह, महाराष्ट्र अं. नि. स. प्रकाशन,
४०, शिवनेरी कॉलनी, गोडोली, सातारा ४१५००१.

## ॥ नम्र आवाहन ॥

प्रिय वाचक,

अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा वारसा कृतिशील करण्यासाठी समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीला घातलेली साद आहे.

अंत:करणपूर्वक मिळणाऱ्या जनाधारावरच ही वाटचाल चालू आहे.आपल्या सक्रिय सदिच्छांच्या अपेक्षेत.:

कृपया लिहावे.

**नरेंद्र दाभोलकर**, कार्याध्यक्ष,
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
१५५, सदाशिव पेठ, सातारा ४१५००२.

( चळवळीस आर्थिक मदत '**अंधश्रद्धा निर्मूलन समिती**' या नावाने पाठवावी.)